।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री व्यंकटेश नवशती ।।

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

## प्रस्तावना

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

आपला भारतदेश नानाविध तीर्थक्षेत्रांनी मंडीत आहे. भारत देशात ब्रह्मा, विष्णु, महेश्वरादि दैवतांचा साक्षात निवास वेगवेगळया तीर्थक्षेत्री असल्यामुळे त्यांच्या अस्तित्वाने ही तीर्थक्षेत्रे पतित पावन, भक्तोध्दारक, मनोकामनापूर्ति करणारी आहेत, असा दृढविश्वास भक्तगणांच्या मनात आहे. अशा पवित्र स्थानांमधील एक अतिशय प्रसिध्द क्षेत्र म्हणजे व्यंकटाचल म्हणजेच व्यंकटगिरी आहे. या पर्वतावर प्रत्यक्ष व्यंकटेशाचा निवास असून हे स्थान कृत, त्रेता, द्वापार आणि कलियुग या चारही युगात पूजनीय झालेले आहे. या व्यंकटगिरीला वेगवेगळया युगात वेगवेगळी नावे आहेत.

कृतयुगात 'वृषभाद्रि पर्वत', त्रेतायुगात 'अंजनाद्री पर्वत', द्वापारयुगात 'शेषाचल पर्वत', आणि आत कलियुगात व्यंकटगिरी नावाने प्रसिध्द आहे. आपल्याकडे 'तिरुपती बालाजी' या नावावे व्यंकटेश देवता प्रसिध्द आहे. असे मानले जाते की श्री व्यंकटेश हे भक्तवत्सल असून भक्तांच्या

हाकेला धावून येतो, संकटनिवारण करतो. अर्थात अशी दृढ श्रध्दा सर्वच प्रांतातील भक्तांच्या मनात आहे. कर्नाटकामध्ये तर 'संकट बंदाग व्यंकटरमणा' अशी म्हणच प्रसिध्द झालेली आहे. भारताच्या काय तर जगाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भक्तगण व्यंकटेशाच्या दर्शनासाठी येतात. नानाविध नवस बोलून विविध स्वरुपात म्हणजेच सोने, चांदी, पैसे या रुपात मुक्तपणे दान श्रीव्यंकटेशाच्या हुंडीत टाकतात. आपल्या संकटाचे निवारण श्री व्यंकटेशाने केल्याची प्रचिती लाखो भक्तगणांना येते. सर्व प्रकारच्या नवसांमध्ये 'श्रीव्यंकटेश कल्याण' महोत्सवाचे महत्त्व अधिक मानले जाते. श्रीव्यंकटेशाचा पद्मावतीसह विवाह लावणे यास 'श्रीव्यंकटेश कल्याण महोत्सव' असे म्हणतात. हा उत्सव करणे हे एक पवित्र कार्य आहे, हे भवतापहारक असुन भुक्तीमुक्तीदायक आहे असे मानले जाते.

भविष्यपुराणात श्रीव्यंकटेशाचा अवतार, विष्णुने हा अवतार घेण्याचे कारण बकुला दासीने त्याचे केलेले पालन आणि त्याचे कारण, पद्मावतीसह विवाह, इत्यादी विषयीची कथा सविस्तर स्वरुपात आलेली आहे. या कथेच्या पठणाने नव्हे तर श्रवणानेही मनोरथ पूर्ती होते अशी मान्यता आहे.आपले परमदैवत श्रीस्वामी समर्थांनी म्हणूनच ही कथा संक्षिप्त रुपात भक्तगणांपर्यंत

पोहोचवण्यासाठी तिचे पारायण, वाचन, श्रवण करता यावे यासाठी श्रीव्यंकटेशाची कथा ‘श्रीव्यंकटेश नवशती’ लिहीण्याची प्रेरणा मला दिली. स्वामींच्याच कृपाशीर्वादाने श्रीव्यंकटेशाचे माहात्म्य श्रीव्यंकटेश नवशती मध्ये साकारणे शक्य झाले आहे. प्रेरक, कर्ता, करविता सारे काही श्रीस्वामी समर्थच. त्यांच्या कृपेने प्रासादिक झालेली ही नवशती स्वामींच्याच चरणी अर्पण करतो. स्वामींच्याच प्रेरणेतून साकारलेली ही श्रीव्यंकटेश नवशती. हया नवशतीचे श्रवण,वाचन, पारायण करणाऱ्यास श्रीव्यंकटेशाची कृपा प्राप्त होऊन त्याचे सकल मनोरथ सिध्द होतील असा स्वामींचा आशीर्वाद या श्रीव्यंकटेश नवशतीस प्राप्त झाला आहे.

सर्व स्वामीभक्त, श्रीव्यंकटेशभक्तांनी या ग्रंथाचे श्रवण, वाचन, पारायण करुन स्वामी कृपेचा श्रीव्यंकटेशाच्या वरदहस्ताचा लाभ घेऊन आपुले जीवन कृतार्थ करावे अशी विनम्र विनंती लेखक स्वामीभक्त वैद्य श्री गणेश लक्ष्मणराव शिंदे आपणास करीत आहे.

शुभं भवतु

# ।। अध्याय पहिला ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे विनायका। गणेश गणपती जगत्पालका। आद्य पूजिता गणनायका। आलो शरण तवचरणी।।१।। काय वर्णू तव महती। न कळे वेदांस पार निश्चिती। तव कृपे वाहे सरस्वती। विघ्नहारक तूच असशी।।२।। इच्छा मनी असे एकची। वर्णावे व्यंकटेशमहात्म्यासी। लीला अगाध वर्णून त्याची। साकारावी नवशती।।३।। व्हावे सर्व विघ्नांचे हरण। असशी तूच भवभयतारण। व्यंकटेशाची महती गहन। लिहिण्या स्फूर्ती द्यावी मज।।४।। आता वंदितो सरस्वतीसी। चार वाणी तत्कृपे स्फुरती। अक्षरांस शब्दत्व निश्चिती। तिचिया कृपे लाभतसे।।५।। निराकारास साकारशी तू। सकल देवतांसी वंद्य तू। सृष्टी जगत्कारणही तू। तूची माया तूची शारदा।।६।। होता तुझी कृपा जीवा। निराकाराचा ठाव लागे जीवा। अव्यक्तासी सहजी व्यक्तता। तव कृपे लाभतसे।।७।। व्यंकटेशाचा महिमा अगाध। करु म्हणे मी वर्णन। त्यास्तव प्रथम वरदान। माते तुझेची पाहीजे।।८।।

भावे वंदून तव चरणासी। करीतो सुरुवात नवशतीसी। पूर्ण करणारी तूची असशी। तुझी लीला असे अगम्य।।९।। नमन करीतो स्वामिचरणी। दिली तयांनी हाती लेखणी। व्यंकटेश नवशती पूर्ण करुनी। करावे धन्य तुमच्या भक्ता।।१०।। श्री स्वामी समर्थ। जय जय स्वामी समर्थ। मंत्र हा जपुनी वारंवार। घेतली हाती ही लेखणी।।११।। आता वंदन मम मातेसी। ठेवीले मस्तक पितृचरणासी। त्यांचा कृपाहस्त असे शिरी। धन्य धन्य असे मी।।१२।। व्यंकटेशाचा अगाध महिमा। सप्तगिरी वास तयाचा। दर्शने मात्र त्या पर्वताच्या। पापक्षय होतसे क्षणमात्रे।।१३।। व्यंकटेशा गोविंदा मुकुंदा। भवभयहरणा वासुदेवा। असे अगाध तव महिमा। साकारु कैसा नवशती माजी।।१४।। सांगतो प्रथम पुरातन कथा। होता दुःखी जनकराजा। पातला तेंव्हा त्याचे दरबारा। शतानंद पुत्र गौतमाचा।।१५।। शतानंद म्हणे जनकरायासी। वैकुंठनायक वसे पर्वतावरी। करीता श्रवण त्याचे माहात्म्यासी। सकलप्राणीमात्र होती पावन।।१६।। न राही दुःख पापलेश। महिमा भवभय निवारक। जाती जळुनी सर्व पातकं। लाभे शांती जीवासी।।१७।। लाभती तत्कृपे विद्या अन् धन। अल्पायुष्यासी दीर्घायुष्य। संतती संपत्ती आणि ज्ञान। श्रवणमात्रे होती प्राप्त।।१८।। वैकुंठच जणु धरणीवरी। ऐसा शेषाचल महाद्रि। महात्म्य कैसे वर्णेल वैखरी। ब्रह्म इंद्रही थकले जेथे।।१९।। सांगतो ऐक आता वर्णन। श्री वैकुण्ठगिरीचे

महान। कृतयुगी त्याचे नाम। वृषभाद्रि ऐसे होते।।२०।। त्रेतायुगी नाम अंजनाद्रि। शेषाचल असे द्वापारी। श्री व्यंकटाद्रि नामे कलीयुगी। बहु प्रसिद्ध असे तो।।२१।। जनक विचारी शतानंदासी। कृतयुगी वृषभाद्रि नाम त्यासी। अंजनाद्रि काय म्हणूनी त्रेतायुगी। द्वापारी शेषाचल का म्हणती।।२२।। कलीयुगी व्यंकटाद्रि का म्हणती। विविध ऐसी नामे तयासी। कोणते कारणे असती लाभली। सांगावे मजसी करुन वर्णन।।२३।। ऐकोनी आनंदला शतानंद। म्हणे सांगेन सकल कथा पूर्ण। ऐक तू एकचित्त होऊन। झाला राजा हर्षित।।२४।। राजसभा त्याची भरली पूर्ण। ब्रह्मक्षत्रियादि चहु वर्ण। सावध होवोनी सर्व साधुजन। ऐकती कथा देऊन ध्यान।।२५।। सांगतसे पुढे वामनंदन। ऐकावी जी कथा संपूर्ण। कृतयुगी वृषभाद्रि ऐसे नाम। कोणते कारणे असे पडले।।२६।। वृषभासूर नामे निशाचर। होता पूर्वी अत्यंत भयंकर। परमपापी अति निष्ठूर। लोकांसी बहुपीडा करीतसे।।२७।। कठोर निर्लज्ज दुराचारी। होता लावीत सिंदुर कपाळी। विक्राळ वदन शुभ्रदाढी। होता उन्मत्त तो राक्षस।।२८।। तुंबर तीर्थासमीप बसत। त्याचे भये विप्र चळचळा कापत। त्याचे भये न घडे तपाचरण। स्नान संध्याही कठीण असे।।२९।। न घडती नित्य नेम। न चाले अध्ययन अध्यापन। न घडतसे अनुष्ठान। सर्वही ऋषी होते भयभीत।।३०।। करु पाहती यम नियम। म्हणती करु प्राणायाम। तितक्यात

हा असूर दारुण। क्रोधे हाका मारीतसे।।३१।। होई तेणे चित्त विचलित। भयभीत कातर होई मन। न घडे कोणताही आचार। ऐसा अत्त्याचारी तो दैत्य।।३२।। परि तो दैत्य विष्णुभक्त। विष्णुभजनी तो तत्पर। श्री नृसिंह शालीग्राम। पूजन नित्य तो करीतसे।।३३।। त्याचा असे एक निश्चय। छेदूनी स्वत:चे शीर। नित्यनेमे विष्णु चरणावर। भक्तिभावे तो वाहतसे।।३४।। तेणे प्रसन्न होई जगन्नाथ। तयासी सजीव करी नित्य। ऐसे पाच सहस्रवर्ष पर्यंत। नित्यनेमे चालू होते।।३५।। होता दैत्य भाविक भक्त। परी क्रूर कर्मे नित्य करीत। असूर स्वभावे तो वर्तत। विप्रजन होते भयभीत।।३६।। एकदा एकत्र मिळोनी ऋषी। करीती विचार एकमेकांसी। कैसे करावे त्या दैत्यासी। मरण कैसे होईल प्राप्त।।३७।। संकट असे परम दुर्धर। कोणता उपाय योजावा जरुर। करील कोण आपणा सहकार। जावे शरण कोणासी।।३८।। करती विचार ऋषी विप्र। कोण करील आपणा भयमुक्त। करु शकेल जो असुरवध। ऐसा असे फक्त श्रीहरी।।३९।। तोच मारील आपुला वैरी। आहे तो भक्त जन कैवारी। त्रिभुवन स्वामी वैकुण्ठविहारी। सर्व जाऊ शरण त्यासी।।४०।। विचार ऐसा करुनी मनात। गेले सर्व चढून पर्वत। स्मरती मुरारीस अंतर्मनात। हात जोडोनी वंदन करती।।४१।। म्हणती ते केशवा अनंता। माधवा गोपाला मधुसूदना। भक्ततारका शेषशयना। क्षीराब्धिनिवासा अच्युता।।४२।।

लक्ष्मीरमणा कौस्तुभवंता। साऱ्या सृष्टिचा तू नियंता। भक्ताभिमानी श्रीनिवासा। तूच असशी तारण आम्हा।।४३।। तुझीच वेदाज्ञा शिरी वंदून। करीत असता तुझे चिंतन। करी विघ्न दैत्य दुर्जन। रक्षी श्रीहरी तू आम्हास।।४४।। आता काय आणिक वर्णावी। तुझे ध्यान कैसे करु मुरारी। धावूनी येई तू ची झडकरी। पावू दे अंत आमुचा वैरी।।४५।। ऐकोनिया ऐसे स्तवन। झाला श्रीनिवास प्रसन्न। सत्वर गरुडावर आरुढोन। वैकुण्ठगिरी तो पातला।।४६।। शोभतसे कटी पीतांबर। गळा वैजयंतीमाळा सुंदर। विराजे कपाळी केशरकस्तुर। कर्णी मकराकार कुंडले शोभती।।४७।। कमलावदन कमलनयन। आजानुबाहु तनु कोमल सुंदर। घनश्याम वर्ण सुहास्यवदन। तेजःपुंज तो शोभतसे।।४८।। शंख, चक्र, गदा, पद्म। हस्ती शोभती ऐसी आयुध। भक्ताभिमानी श्रीवास। देखोनी विप्र आनंदीत।।४९।। पाहुनी ऐसा नारायण। मुदीत झाले ऋषिजन। म्हणती होईल संकटहरण। लोटांगण ते घालती।।५०।। जाणोनी ऋषी विप्रमनोगत। म्हणे तयांसी धरणी पालक। मनी नसो चिंता लवलेश। तारीन मी तुम्हा सकला।।५१।। देऊनी तयांसी अभयवर। निघाला तेथून लक्ष्मीवर। आला तैसाच असुरा समोर। असुर बहु हर्षित झाला।।५२।। असुर म्हणे मग विष्णु प्रती। आपण दीनानाथ निश्चिती। केली इतुकी तुमची भक्ती। परी दर्शन माते न घडले।।५३।। अगमानिगमासी न ये वर्णिता। ऐसी

तुझी महिमा अनंता। निराकार निर्विकार परब्रह्मा। वाणीसी न वर्णवे महती।।५४।। ना कळसी तू वेदांसी। अशक्य असे सहस्रवदनासी। अष्टांग योगसाधने न दिसशी। दर्शन तुझे असे दुर्लभ।।५५।। नाना तपे आचरिता। प्राप्त न होसी रमाकांता। भुलसी भक्तीशी अनाथनाथा। भक्तवत्सल तू असशी।।५६।। पंचसहस्र संवत्सर। केले मी तप घनघोर। परी न दर्शन साचार। बहुत यत्न मी केले।।५७।। आता गांजले तव भक्तगण। तयांसाठी आलासी धावोन। भक्त पालक ब्रीद गहन। साच करोनी दाविले तू।।५८।। ऐकून संतुष्ट झाला मुरारी। म्हणे असुरासी मधुकैटभारी। मागणे तुझे तू झडकरी। घ्यावे मागून माझ्या भक्ता।।५९।। असुर म्हणे नको सिंहासन। इंद्रपदाची आस नसे मज। परी बाहु मम पावती स्फुरण। देई मजसी युध्दभिक्षा।।६०।। ऐकोनी त्याचे ऐसे वचन। जाहला संकर्षण प्रसन्न। ग्राह्य असे मज तव वचन। म्हणून युध्दास सज्ज जाहला।।६१।। सज्ज असुर युध्दालागी। केली सिध्द शस्त्र सामग्री। शौर्य दाखवण्या रणामाजी। सिध्द असुर जाहला।।६२।। हरीसवे भिडला असुर। सुरु झाले युध्द घनघोर। झाले भयभीत सारे सुरवर। भये दिग्गज कापू लागले।।६३।। आपापले विमानी बैसोन। कौतुके सुर पाहती रण। आदि वराह सावरोन। धरती धरणी दाढेवरी।।६४।। चालले घनघोर रण। चहुकडे दाटले बाण। गेला मार्तण्ड झाकळून। हरी

असुर भिडती एकमेकांशी।।६५।। द्विज जाहले चिंताग्रस्त। म्हणती हरी बहु सुकुमार। असुर करी क्रूर प्रहार। कैसा आटोपेल हा असुर।।६६।। परी चिंतिती फिरुनी मनी। झाला सगुण हा देवशिखामणी। असे काय अशक्य त्यालागोनी। असुरवध होईल निश्चित।।६७।। भक्तांसाठी उचलला गोवर्धन। केले अनेक असुरमर्दन। करील दुष्टहनन न लागता क्षण। थोर पराक्रम असे याचा।।६८।। असो चालले युध्द दुर्धर। शार्ङ्ग धनुष्यावर चढवूनी शर। सोडीतसे चक्रपाणी ते शर। असुरालागी लक्षुनिया।।६९।। शक्तिपाश गदा तोमर। असिलता आदि विभिन्न अस्त्र। सोडी राक्षस बहुत प्रकार। परी हरी नाटोपे त्यासी।।७०।। आसुरी माया परम अद्भूत। करीतसे प्रकट तो दैत्य। क्षणात व्याघ्रादि रुप धरीत। परम भयंकर तये वेळी।।७१।। परी हरी असे मायानाथ। असुरमाया तेथ काय करीत। राक्षसाची कपट विद्या बहुत। हरीसामोरी त्या न फळती।।७२।। नानाविध शस्त्रपात। असुरावरी करी रमानाथ। नाना प्रकारे युध्द करीत। परी नाटोपे दैत्य तया।।७३।। अग्निअस्त्र, पर्जन्यास्त्र। वातास्त्र, पन्नगास्त्र। पर्वत, वज्र, गरुड, सर्प। विविधास्त्रे ते योजिती।।७४।। ऐसे युध्द रात्रं दिवस। चालले सहस्र वर्ष पर्यंत। तरी नाटोपे असुरनाथ। रण घनघोर चालले असे।।७५।। लक्ष्मीरमण करी विचार। करी तो विश्वरुप धारण। हरीचे ते रुप अगाध। कृतांतही पाहू न शके।।७६।। भासे तयाचे

तेज समुद्री। चंद्र सूर्यही बुचकळया घेती। पामर चराचर जीवांसी। कल्पांतची तो वाटे।।७७।। सहस्त्रमस्तकें त्याची अद्‌भूत। सहस्त्रकर आयुधे मंडित। सहस्त्र चरण विराजित। सहस्त्र नयन त्याचे दिसती।।७८।। सहस्त्रमुखे सहस्त्रजिव्हा। सहस्त्रबाहु असती तया। पाहुनी अजस्त्र रुप जीवा। ठाव आपुला न सापडे।।७९।। रक्त, श्वेत आणि पीत। कृष्ण, नीलवर्ण भासत। परम भयानक हरीचे रुप। पाहणे अशक्य तयाकडे।।८०।। पृथ्वी आणि अंबर। दशदिशा व्यापिल्या समग्र। दंत, दाढा, कराळ, शुभ्र। महाभयंकर शोभती।।८१।। तेहतीस कोटी सुरवर। दिसती तयाचे अवयव। नेत्र तयाचे मित्र। अत्रिपुत्र मन तयाचे।।८२।। हरीचे ऐसे रुप अद्‌भूत। पाहुनी असुर भयभीत। श्रीधराचे अलोट तेज। अवलोकी होऊन चकीत।।८३।। म्हणे आता माझा पराक्रम। न चाले या दिव्यासमोर। हा तर साक्षात जगन्नाथ। भक्तकार्यार्थ पातला।।८४।। पुन्हा पाहता नविन रुप। झाला हरी आता सगुण। चतुर्भुज रुप गरुडावर बैसोन। घेतले हाती धनुष्यबाण।।८५।। रुप ते माधवाचे सुंदर। दृष्टीस न पडे चुकून। जरी केले अष्टांग साधन। न लाभे ऐसे दर्शन।।८६।। आचरीले जरी महायज्ञ। केले सारे तीर्थाटन। प्रयागी केले देह विसर्जन। तयासीही दुर्लभ असे हे।।८७।। सुर, भुसुर सदा इच्छिती। अष्टौप्रहर तयासी ध्याती। परी तयांसीही प्राप्ती। न होई कदापि सर्वथा।।८८।। काय असे असुराचे

सुकृत। जेणे ऐसे दर्शन प्राप्त। पाहिला साक्षात रमानाथ। रुप अद्‍भूतही पाहीले।।८९।। तेव्हा तो इंदिरावर। घेऊन हाती सुदर्शन। धावून गेला असुरावर। वध करण्यासी तेधवा।।९०।। पाहून हे तो असुर। करी हरीसी साष्टांग नमन। म्हणे करी आता माझे हनन। श्रीनिवासा गोविंदा।।९१।। तुझ्या चक्राचा पराक्रम। पूर्वीच मी ऐकिला उत्तम। परी तव रुप ऐसे परम। आजची नयनी देखिले।।९२।। तुझे रुप पहावयासी। योगी होती परम कष्टी। कोणासही ना कळसी जगजेठी। कृपादृष्टि मजवरी केली।।९३।। बोले तेंव्हा इंदिरावर। करीन मी तुझा संहार। घे मागून इच्छित वर। तव अंतकाळी आता असुरा।।९४।। राक्षस मग म्हणे रमानाथा। मागणे अंती हेच आता। असावे माझे नाम ह्या पर्वता। हीच इच्छा असे मानसी।।९५।। कृतयुगाचा होईल अंत। तोवरी यासी नाम प्राप्त। वृषभाचल म्हणूनी विख्यात। जाहले पाहीजे स्वामिया।।९६।। आणि मजसवे केला संग्राम। ही कथा ऐकती जे जन। तयांसी तू होऊनी प्रसन्न। अक्षयपद दे अनंता।।९७।। ऐसे बोल ऐकोनी श्रीधर। अवश्य म्हणूनी देऊनी वर। झणी सोडोनी सुदर्शन। मस्तक असुराचे छेदीले।।९८।। आनंदित झाले द्विज समग्र। सुमने वर्षती सुरवर। ऋषीही सारे झाले हर्षित। जमले सारे हरीभोवती।।९९।। तें पासूनी वृषभाचल। नाम पावला हा अचल। ऐसी ही कथा सुंदर। शतानंदे जनका सांगितली।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमो श्री स्वामी समर्था। तू प्रत्यक्ष दत्तात्रय स्वरुपा। असशी तूच श्रीपाद श्रीवल्लभ। नृसिंहमूर्ति रुपे ही प्रकटला।।१।। मातेची ममता पित्याची छाया। अगाध असे हो तुमची माया। आलो शरण तुमच्या पाया। उध्दरावे तुम्ही या गणेशासी।।२।। तुमच्या कृपेने घेतली आण। व्यंकटेशाचे चरित्र वर्णन करीन। परी असे मी अत्यंत दीन। तव भक्तीचा असे स्वाभिमान।।३।। करावे कार्य मम हस्ते पूर्ण। घडवावे सर्वा व्यंकटेश दर्शन। चरित्र वर्णावे नवशतीत पूर्ण। हीच विनंती तुमचे चरणी।।४।। परमात्मा परात्पर परेशा। सकलेश्वर स्वामी सुरेशा। विश्वेश्वर विश्वात्मका विश्वरुपा। श्रीहरि तूची तारणकर्ता।।५।। सागरमंथनी मंदराचळ। भेदित चालिला रसातळ। कुर्मरुपें तू घननीळ। धरिलास अचल पृष्ठीवरी।।६।। हिरण्याक्ष दैत्य दुर्जन। पृथ्वी नेत असता चोरुन। वराहवेषे तू प्रकटलास। दंते धारण केली धरणी।।७।। हिरण्यकश्यपु पुत्र तव भक्त। पिता करी छळ अतोनात। नृसिंहरुपे जाहलासी प्रकट। प्रल्हादासी तू

तारीले।।८।। बळी करीतसे शतयज्ञ। धरीला तूची वामनवेष। भूदानमिसें त्या दैत्यास। पाताळासी तू पाठविले।।९।। तीन सप्तकें ही धरित्री। केली निःक्षत्रिय मातृ कैवारी। भार्गवरुपा मधुकैटभारि। भक्त कैवारी तूच असशी।।१०।। उन्मत्त फार झाला रावण। बंदी घातले त्याने सुरगण। तू श्रीरामरुप करुन धारण। राक्षस विनाशिले सर्व।।११।। कंस, चाणूर, कालयवन। शिशुपाल, वक्रदंत, दुर्जन। श्रीकृष्णावतार तू घेऊन। तूची मर्दिले सर्व असुर।।१२।। कलीयुगी लोक मतिहीन। विसरीले स्वत्वाची खूण। बौध्दरुप तू धारण करुन। योग्य मार्गासी लाविले।।१३।। म्लेंच्छ माजती अपार। त्या मर्दाया उदित साचार। कल्किरुप श्रीकरधर। तुरगारुढ होऊन येसी।।१४।। तोची तू वेंकटाद्रिवरी। उभा असशी भक्तजन कैवारी। भेटसी भक्ता अहोरात्री। भक्तवत्सला गोविंदा।।१५।। कृतयुगी जाहले व्यंकटाद्रि नाम। प्रथमाध्यायी झाली कथा संपन्न। आलो व्यंकटेशा तुज शरण। चालवावी ती कथा पुढती।।१६।। जयजय जयजय धरणीनाथा। दयासागरा कृपावंता। परंज्योती तू परमात्मा। तव कृपाहस्त असो मस्तकी।।१७।। व्यंकटाद्रि तव निवास स्थान। सप्तगिरीही त्यास म्हणती जन। त्रेतायुगी अंजनाद्रि ऐसे नाम। तीच कथा सांगतसे शतानंद।।१८।। सांगतसे जनका शतानंद। पुढील कथा ही सुंदर। ऐका श्रोत्र करुनी सादर। ऐकण्या तत्पर झाले सर्व।।१९।। कृतानंतर आले त्रेतायुग। तेव्हा केसरी

नाम वानर। त्याची स्त्री पतिव्रता थोर। अंजनी नाम असे तियेचे।।२०।। नसे पोटी पुत्रसंतान। झाली अंजनी फार उद्विग्न। झाले चिंताक्रांत मन। विचार करी ती मनोमनी।।२१।। पुत्रावाचून आपुले मंदिर। जैसे प्राणाविन शरीर। फळांविना जैसे तरुवर। व्यर्थची हे जीवन माझे।।२२।। या कारणास्तव अंजनी। परम चिंतातुर असे मनी। त्या वनी मतंगनामें मुनी। त्यांच्या आश्रमासी ती आली।।२३।। ऋषींमाजी मुकुटमणी। तपस्वियांमाजी अग्रगणी। त्यांचेपाशी येऊन अंजनी। साष्टांग नमन करीतसे।।२४।। त्यांसी म्हणे ती ऋषिवर्या। तू तपस्वियांमाजी राजा। आले शरण तुमच्या पाया। करावी छाया कृपेची।।२५।। नाही मजपोटी सत्पुत्र। तेणे असे मी चिंताग्रस्त। तुम्ही सद्गुरु कृपासागर। सांगा निर्धार काय करु।।२६।। ऐकोनी तिचे ऐसे वचन। बोलती मतंग कृपा करोन। म्हणती कल्याणी ऐक पूर्ण। सांगतो तुज युक्तीते।।२७।। पतिव्रते ऐक मम वचन। पंपापासोनी पूर्वेस जाण। दूरवर पन्नास योजन। नारसिंहाचा आश्रम असे।।२८।। त्याच्या दक्षिण दिशेसी। नारायण गिरीचे उत्तरेसी। स्वामीतीर्था पासून कोसावरी। वियद्गंगा वसतसे।।२९।। तू आता जाऊन तेथवरी। तेथे स्नान करुन झडकरी। श्रद्धायुक्त तपश्चर्या करी। मन:पूर्वक द्वादश वर्षे।।३०।। त्यामुळे पुण्यप्राप्ती होवोन। होईल दिव्यपुत्र तुज लागून। ऐकोनी ऐसे ऋषिवचन। अंजनी तेथून निघाली।।३१।। तत्काळ पोहोचली

त्या स्थानी। केले स्नान स्वामी तीर्थी। नमून वराहरुप भगवानासी। अश्वत्थ प्रदक्षिणा तिने केली।।३२।। निर्धारे त्यागिला तिने आहार। आचरिले ऐसे तप घनघोर। काष्ठवत झाले तिचे शरीर। सर्व भोग तिने त्यागिले।।३३।। परम शुचिर्भूत होऊन। एकाग्रचित्ते करी ध्यान। ऐसी द्वादशवर्षे होता पूर्ण। नवल एक तिथे घडले।।३४।। एके दिनी ती अंजनी। ध्यान करी अंजली पसरोनी। तो साक्षात पवमान येऊनी। प्रसाद दिधला तियेसी।।३५।। पक्व फल तये अवसरी। दिधले त्याने अंजनीचे करी। नेत्र उघडोनी ती येरी। पाहती झाली ते वेळी।।३६।। प्रसाद ऐसे जाणोन। तुरंत केले ते भक्षण। तेणे जाहली तात्काळ गर्भिण। अजंनीदेवी तेधवा।।३७।। सरता दशमास पूर्ण। प्रसवली ती पुत्र सबळ। पाहुन गोड पुत्रमुख। जाहली मुदीत ती मानसी।।३८।। परम तेजस्वी दैदिप्यवंत। वानरवेष तो बळवंत। भूवरी अवतरला हनुमंत। श्रीरामदूत प्रतापी।।३९।। अंजनीसी पुत्र लाभला। तेंव्हा पासून या पर्वताला।'अंजनाचल' नाम लाभे त्याला। झाला त्रेतायुगी ख्यात हा अचल।।४०।। सांगतो आता पुढील कथा। द्वापरायुगी याच पर्वता। नाम शेषाचल लाभे तयाला। ऐका अपूर्व ती कथा।।४१।। एकदा वैकुण्ठी भगवान। एकांती लक्ष्मी सहमान। करिते जाहले होते शयन। नवल अर्पूव घडले तदा।।४२।। भगवंताचे मुख्य द्वारपाल। सनकादिकी शापिले प्रबळ। दैत्य योनित जाहला जन्म। ते

कारण द्वारी नव्हते ते।।४३।। भोगिनायक शेष जाण। करीतसे ते वेळी द्वार रक्षण। ऐसे असता एक दिन। नवल अपूर्व घडले तेथे।।४४।। साक्षात प्राणेश आला तेथ। तो दर्शनास जाऊ लागत। नागेंद्रे तया रोखीले दारात। म्हणे आत जाऊं नये।।४५।। ऐकून पुसे प्राणेश त्यासी। कोणते कारणे मज अडविसी। तेंव्हा शेष म्हणे तयासी। नाही सोडणार मी तुज।।४६।। ऐकुन बहु संतापला प्राणेश। म्हणे मी आता करीन प्रवेश। असे हरीचे द्वार विशेष। नसे रोख कोणासही।।४७।। जयविजय सनकादिकांसी। अवरोधिता गती झाली कैसी। ठाऊक असता सारे तुजसी। केन कारणेन अडविसी मज।।४८।। ऐकून क्रोधे कापे शेष। वायुसी म्हणे तू मूर्ख। नाही ऐकसी माझे वचन। जा सोडणार नाही तुज।।४९।। न जाणसी तू मजसी। येऊन भलतेच तू जल्पसी। असे मजवरी हरि प्रीती। आहे मी तया अतिप्रिय।।५०।। म्हणूनच माझ्यावरी सर्वेश्वर। करितसे शयन निरंतर। कैलासीचा पति श्रीशंकर। भूषणरुपे सांभाळी मज।।५१।। मीच शिरी धरली धरणी। जाणे मम प्रताप चक्रपाणी। माझे महत्त्व न जाणोनी। करिसी मजसवे वाग्युध्द।।५२।। प्राणेश म्हणे स्वये मुखी। तूच स्वत:ची स्तुती करशी। ऐसा शतमूर्ख तू असशी। तुज ऐसा तू च बापा।।५३।। तुझा आणि माझा पराक्रम। जाणतसे तो मेघश्याम। वल्गना व्यर्थ करिशी जाण। अरे अधमा मध्ये तू अधम।।५४।। शेष सांगतसे वायुसी।

सर्वच भक्त प्रिय हरिसी। परी मजवरी प्रीती विशेषी। हे सत्य जाण बापा।।५५।। उत्तरे तयासी प्राणेश। असे पर्यंकावरी चरण सेवक। म्हणून पुत्राहुनी नसे विशेष। अर्थ नीट जाणून घे।।५६।। असशी नित्य हरी जवळी। परी अहंता असे पूर्ण भरली। असे अहंभाव जया अंतरी। न आकळे हरि तयासी।।५७।। ऐसे ते वादिती उभय। बोलती ते वचने कठोर। ऐकून ऐसी गजबज बाहेर। जगन्माता तेथे पातली।।५८।। पाहे ती उभयतांचा कलह। जाऊन करी हरीस निवेदन। म्हणे शेष अन् वायुचे भांडण। असे महाद्वारी चालले।।५९।। काय कारण असे त्याचे। आपणच प्रत्यक्ष पहावे। आपणची भांडण मिटवावे। आपणा वाचून ते न मानिती।।६०।। ऐकोनी ऐसे लक्ष्मीवचन। आले मग बाहेर नारायण। उभयतांनी हरीसी पाहून। तात्काळ साष्टांग नमन केले।।६१।। यावरी तो विष्णु कैटभारि। शेषासी पुसे ते अवसरी। कासया कलह मांडला दारी। सांग मजसी झडकरी।।६२।। श्री हरीस मग धरणीधर। सांगता जाहला समाचार। म्हणे हा वायु मजसमान। कैसा असेल स्वामीराया।।६३।। नांदतो सदा तुज समीप। मीच असे तुज अतिप्रिय। माझे इतुका बलसागर। कैसा असेल त्रिलोकी।।६४।। मीच असे बलवंत वीर। पाताळ, भू अन् स्वर्गी जाण। नसे मज समे अन्य धीर। पराक्रमी कोण त्रिभुवनी।।६५।। ऐकोनी हसला रमारमण। म्हणे करु नये स्वगुण वर्णन। अरे असे हे मूर्ख लक्षण।

त्रिलोकी सर्व बुध मानिती।।६६।। दाखवावा प्रत्यक्ष पराक्रम। जेणे म्हणतील सर्व धन्य। स्वमुखेची न करावे वर्णन। ऐसे सत्य जाण बा।।६७।। आता मी सांगतो तुजसी। असे गिरीमेरुचा पुत्र उत्तरेसी। तू स्वदेह रज्जुने वेष्टोनी। दृढ धरावे त्या पर्वतासी।।६८।। नंतर वायु स्वबळे करुन। उडवील त्या पर्वता लागून। कोणाचे बळ किती म्हणून। होईल परीक्षा तये वेळी।।६९।। सर्वां समोर हा पराक्रम। दाखवावा उभयता करुन। ऐसे बोलता लक्ष्मीरमण। अवश्य म्हणून ते निघाले।।७०।। हे ऐसे अपूर्व कौतुक पाहण्या। दाटला आकाशी सुरजनमेळा। सावित्रि सहीत चतुरानन स्वतः। कौतुक पाहण्या तेथ आला।।७१।। अपर्णेसह आला पंचवक्त्र। शचीसह आला पुरंदर। यक्षगण, गंधर्व, किन्नर। अष्ट दिक्पालही तेथे पातले।।७२।। आले सर्व ऋषीगण। त्या सर्वा पाहून पन्नगेश्वर। मनी गर्व धरुनी फार। पर्वता समीप तो आला।।७३।। स्व तनु रज्जु करुनी विशाळ। घाली पर्वतासी तो वेष्टन। आपुले स्वबळ एकत्र करुन। पर्वतासी त्याने दृढ धरीले।।७४।। यावरी तो लक्ष्मीरमण। देई आज्ञा वायुस तात्काळ। करी प्रकट तू निजबळ। सर्वां समोरी प्राणेशा।।७५।। आज्ञा ऐकोनी चंड मारुत। कनिष्ठ अंजुळीने अकस्मात। उडवी सहजची तो पर्वत। शेषा समवेत तेधवा।।७६।। पडिला पाच कोटी योजनांवर। दक्षिणे दिग्भागी तो गिरिवर। त्रिदश, ऋषी, मुनी, सर्व। मानिती नवल ते

पाहुनी।।७७।। जाहला सर्वत्र जयकार। देव करीती पुष्प वर्षाव। शेषाचा गर्वाभिमान सर्व। गेला गळोनी तये वेळी।।७८।। आला धावोनी चरणा जवळी। म्हणे करी कृपा वनमाळी। मी बलसागर मानीत होतो मनी। आज माझा गर्व गेला।।७९।। म्हणे कमलानाथा अनंता। ठेवितो चरणी मी माथा। इंदिरा रमणा भक्तवत्सला। कृपा करी मजवरी।।८०।। मग नमन करी तो वायुसी। न जाणले मी तव सामर्थ्यासी। केला विवाद अभिमान धरुन। क्षमा करी प्रभंजना।।८१।। प्रभंजन म्हणाला शेषासी। नसावा दुराभिमान मानसी। गर्व येऊ नये भक्तांसी। असे श्रीहरी सर्व जाणता।।८२।। चंद्र सूर्य सर्वांसी समान। तैसाची असे वैकुण्ठनायक। न करी भक्तांमध्ये भेदभाव। असे सर्वांसी तो समान।।८३।। अरे आपण श्रीहरीचे दास। अभिमान ह्दयी कशास। लाग श्रीहरीच्या चरणास। भज तयासी भक्तिभावे।।८४।। ऐसा शेषाने वेष्टिला पर्वत। लाभले शेषाचल नाम तयास। सांगे शतानंद जनकास। पूर्वकथा ही द्वापारीची।।८५।। नमन कमलावर कमलभूषणा। कमलोद्‌भवजनका कमळनयना। कमलनाभा कमलशयना। कमलधारका कमलप्रिया।।८६।। सादर नमन श्री व्यंकटेशा। सद्‌चिंदानंद आदिपुरुषा। इंदिरावर शेषाद्रि निवासा। भक्तवत्सला आशा रहिता।।८७।। तू असशी जगस्थित्यंतकारण। निराकार तू झालासी सगुण। वाणी असमर्थ सांगण्या खूण। वर्णनातीत तू बंधमोचका।।८८।। गुण

कैसे वर्णावे श्रीपती। सहस्रमुख शेषास न गती। मी मानव तवदास निश्चिती। कैसे वर्णु गुण मी तुझे।।८९।। तरी करीन म्हटले गुणगान। परी शब्दातीत तू महान। मी तर असे बालक सान। ठेवी मज तव चरणापाशी।।९०।। तव लीला हे विश्व साकार। विश्वचक्र चालविसी निरंतर। रक्षिसी सर्वांसी तू परात्पर। केवी वर्णन करु महिमा।।९१।। तूच सूत्रधारी सर्वेश्वर। कर्ता, करविता, तूच सर्व। तुझे आज्ञे चाले भास्कर। मी तयांपुढे काय असे।।९२।। हा देह वाहीला चरणी। करसी तू विश्वाची उभारणी। उत्पत्ती - धारण - संहारणी। केवळ इच्छामात्रे होती तुझ्या।।९३।। हे श्रीकांता मनमोहना। गोपीवरदा लक्ष्मीरमणा। दहन करिसी मायाविपिना। आलो शरण मी तुजसी।।९४।। वर्णावे तव चरित्र अगाध। जाहली इच्छा मनी सहज। परी मजसी नसे साध्य। वदविता तू ची नारायणा।।९५।। असशी तू सकलवरदाता। नसे न्यून तुझ्या भक्ता। अखिल विश्वाचा तू त्राता। वर्णवी महिमा मज करवी।।९६।। असो आता स्वामीराया। गुणातीत स्वामी समर्था। देई मती या लक्ष्मणसिंधु सुता। ग्रंथ पुढे चालविण्यासी।।९७।। स्वामी समर्थ गुरुवर्य। तो ची परात्पर नारायण। अद्वैत स्वरुप तुमचे पाहून। जाहलो विस्मित मी मानसी।।९८।। असो शिरी तुमचा वरदहस्त। करवावा पूर्ण हा ग्रंथ। शब्दांसी फुटावे पल्लव। अर्थांची व्हावी सुमने।।९९।। सुटावा अलौकिक परिमळ। भक्तीतून दरवळावा

सुगंध। लौकिका लौकिकाची व्हावी भेट। आलो शरण मी उभयतांसी।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय तिसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री गणेश जो विघ्नहर्ता। असे तोची भक्तत्राता। ठेवी शिरी कृपा वरदहस्ता। व्हावी ही लेखणी लिहीती।।१।। श्री स्वामी समर्थ सद्‌गुरु। मी तयांचे अजाण लेकरु। तयांचेच कृपाप्रसादे लिहू। इच्छितो श्री व्यंकटेश नवशती।।२।। शारदा देवीचे चरण वंदून। अरुपाचे रुप करीन वर्णन। प्रत्यक्ष श्री व्यंकटेश दर्शन। घडू दे नवशती वाचताची।।३।। श्री व्यंकटेश रमारमण। काय त्याचे रुप वर्णू मी दीन। परी श्रीसरस्वती कृपेकरुन। करीतो वर्णन मी तयाचे।।४।। मुखकमल सरोज समान। कमलपत्रासम दोन्ही नयन। नाक सुंदर चाफेकळीहून। अधर जैसे कमलदल।।५।। सुंदर वदन परम तेजोमय। प्रभा सहस्त्र सूर्यांहून सतेज। भावमुखी विमल कोमल। चित्त सहज आकर्षितसे।।६।। तमाहून कृष्ण केशकलाप। रूळे ते मानेवरी विशेष। कुंतल कुरळे अतिसुंदर। जाई मोहून मन मयूर।।७।। हस्ती तयाचे सुदर्शन। एक हस्त सिध्द देण्या वरदान। हिरे, माणके,रत्ने शोभयमान। तयाचे हस्तावरी

लखलखती।।८।। करिता केवळ नामस्मरण। येते हृदय उचंबळून। आनंद दाटे तनु भरुन। नाम ही ऐसे मधुर त्याचे।।९।। वाजवितसे बासरी मधुर। ऐकूनी राधा होई आतून। गुंजती अंत:करणातूनी सूर। ऐसी कैसी असे जादू।।१०।। श्रीधरा मुकुंदा मनमोहना। आलो शरण तुज चरणा। पुढील कथा निवेदण्याला। देई मती या स्वामीभक्ता।।११।। सुत सांगती शौनकादिं प्रती। तीच कथा शतानंद सांगती। जनकास शतानंद म्हणती। ऐक पुढील कथा जनका।।१२।। कृतयुगी जो वृषभाद्रि। त्रेतामाजी तोच अंजनाद्रि। द्वापारी नाम असे शेषाद्रि। कलीयुगी वेंकटगिरी नाम याचे।।१३।। कलीयुगी वेंकटगिरी का म्हणती। सांगेन ती कथा तुजप्रती। ऐकावी कथा एकचित्ती। कथा ही असे परमपवित्र।।१४।। कालहस्ती नामें नगरी। होती विख्यात पृथ्वीवरी। द्विजवर नगरजन ते पुरी। नेमें विधियुक्त आचार त्यांचे।।१५।। तेथे राहतसे एक द्विज। पुरंदर ऐसे त्याचे नाम। वेदशास्त्री परम निपुण। हरिभक्त तो सात्विक।।१६।। नित्य नैमित्तिक कर्म सर्व। स्नान संध्यादि नियमित कर्म। नेमे करितसे पंचमहायज्ञ। शुध्द आचरण असे त्याचे।।१७।। एकवचनी असे विश्वासपात्र। दया, क्षमा त्याचे हृदि वसत। ऐसा विप्र सर्व गुणसंपन्न। त्या नगरात राहत असे।।१८।। परी एकच चिंता असे चित्ती। नसे तयास पुत्र संतती। करी व्रतवैकल्यें नाना रीती। पुत्रप्राप्ती होणे साठी।।१९।। शांतचित्ते नित्य नेम करीत।

जाहला तया पुत्र अकस्मात। जाहला तो विप्र हर्ष भरीत। म्हणे हरी मजवरी तुष्टला।।२०।। आनंदयुक्त प्रसन्न मनी। जातकर्म बालकाचे करी। द्विज पती पत्नी समोरी। शुक्ल चंद्रासम बालक वाढे।।२१।। माधव तयाचे नाम ठेविले। आठव्या वर्षी व्रतबंधन केले। वेदशास्त्र मंत्र पठन करविलें। अवघे पुराण पढविले त्यासी।।२२।। बालक झाला विद्यासंपन्न। आश्चर्य करती सर्वजन। पुरंदर मनी असे प्रसन्न। म्हणे माझे भाग्य थोर।।२३।। मग पांडीव राजा विख्यात। तयाची कन्या सुंदर अत्यंत। नाम चंद्रलेखा असे गुणयुक्त। दिधली तयाने माधवाते।।२४।। परमसुंदर चातुर्यखाणी। रुपासी रंभा उर्वशी उणी। तिचे सुंदर रुप पाहुनी। मोहीत होती सर्वजन।।२५।। चंद्रमुखी असे अहिवेणी। केतकीसम रंग तिचा सुंदर चाफेकळी। दंतपंक्ती शुभ कुंदकळी। चाल सुंदर ती असे गजगती।।२६।। ऐसी सुंदर राजकुमारी। माधवास लाभली नवरी। जाहला यथासांग लग्नविधी। आला पुरंदर पुत्र सुनेसहित।।२७।। चंद्रलेखा सोज्ज्वळ सुंदर। असे कोमल तियेचा व्यवहार। चालला सुखेनैव संसार। होते संतुष्ट सर्व मनी।।२८।। परी कैसी ऐसी ईश्वरलीला। प्रवर्तले भलतेच एके दिनाला। माधव दिवसा कामातुर झाला। कांतेस तो सांगतसे।।२९।। चंद्रलेखा म्हणे त्या हसून। अहो आपण शास्त्रज्ञ ब्राह्मण। भलते वेळी ऐसे वर्तत। घडेल कैसे सांगा मज।।३०।। असती घरी सासु अन् श्वसुर। ऐसे कैसे झाला कामातूर। लोक हिंडती

घरी आत बाहेर। कैसे योग्य सांगा तुम्हीच।।३१।। ठाऊक मज असे प्रपंच आपुला। परी सांभाळावे लोकापवादाला। झाली इच्छा म्हणून जगाला। न विसरता येई प्राणेश्वरा।।३२।। या करिता विंनती अवधारी। जिरवा काम शास्त्र विचारी। पसरता निशा या भूवरी। मनोरथ करावे पूर्ण आपण।।३३।। सतीचे ऐसे ऐकून बोल। काय जाणसी तू शास्त्र मोल। नारीस पती हाच ईश्वर। शास्त्री हेच सांगितले असे।।३४।। ऐक प्रिये माझे वचन। देई संग तू मज लागून। मनीच्या सर्व शंका टाकोन। देई मजला संग प्रिये।।३५।। एकदा काम प्रगटता मानसी। न जाणे तो दिवसनिशी। पाहून तव सुंदर वदनासी। माझे चित्त झाले चंचल।।३६।। नको मनी आणी अनमान। येई जवळी सर्व सोडोन। करी माझी कामेच्छा पूर्ण। प्राण संगिनी जाण तू।।३७।। पहा कामाचा थोर प्रताप। बुडाले कामसागरी विषय लोलुप। तेणे वंचिले ते स्वर्ग द्वारास। महाखल असे काम हा।।३८।। या कामाचेच कारणी। लागला क्षय चंद्रा लागुनी। सूर्याचा ही किरण लोप नभी। बुडाले सज्ञानी कामापायी।।३९।। काम कारणे भंगला पाक शासन। शंकराचे ही झाले पतन। विधात्याचे झाले शिर छेदन। या कामा मुळेच हे जाणावे।।४०।। पावला मरण पंडु राजा। झाला विनाश कौरवांचा। वध जाहला कीचकाचा। द्रौपदीवर तो मोहला म्हणून।।४१।। जाहला रावणाचा नाश। भंग पावले विश्वामित्राचे तप। आले मरण

सुंदोपसुंदास। काम हा फार विचित्र असे।।४२।। काम असे अति अपवित्र। परी विव्हळ झाला माधव विप्र। जाहला विशेष आतुर तो विप्र। कांतेस म्हणे देई संग।।४३।। काय म्हणाली ती थोर। ऐका सांगतो सर्व सोडोन। चंद्रलेखा होती चतुर। परी पती मानेना विचार।।४४।। म्हणे जाते आणाया उदक। यावे तुम्ही कुश आणाया। असे गंगातिरी उपवन। पुरवावी आपुली इच्छा तुम्ही।।४५।। ऐकोनी असे सतीवचन। तात्काळ निघाला ब्राह्मण। गाठीले गंगातीरीचे उपवन। लगोलग त्या विप्राने।।४६।। मग घट घेवोनी हाती। जल आणण्याच्या निमित्ती। आली गंगेच्या तीरी सती। पतीस बहु हर्ष जाहला।।४७।। आली कामिनी पाहोन। आला जवळी वेगे करुन। परी नवल आले घडोन। सुंदर तरुणी त्याने पाहीली।।४८।। सरोजासम सुंरद वदन। भाळ विशाळ सुकुमार। ओष्ठ जेवी पलाश मुकुल। अती सुंदर ती तरुणी।।४९।। सरळ नासिका आकर्ण नयन। केतकी वर्ण सुहास्य वदन। रतीचेच जणु सौंदर्य पूर्ण। ठायी तियेचे संचले।।५०।। कनक कलश जेवी सुंदर। तैसे दिसती तिचे पयोधर। तटतटली कंचुकी सुंदर। मनोहर कामिनी ती असे।।५१।। पाहता ऐसी सुंदरी। विप्र मग मनी विचार करी। ही प्राप्त होईल जरी। सुखास अंत नसे की।।५२।। मग म्हणे तो पत्नीसी। जावे बाई तू घरासी। झालो तृप्त मी मानसी। मनोरथ माझे झाले पूर्ण।।५३।। नकोस थांबू क्षण एक।

पाहण्या केवळ तुझे मन। मागितले तुजसी भोगदान। जाई घरी तू सत्वर।।५४।। पतीची आज्ञा मानून। चंद्रलेखा निघाली घरा लागोन। इकडे हा माधव ब्राह्मण। तरुणी जवळी तो आला।।५५।। पूसे तिजसी मग विप्र। सांग तुझी ओळख देख। म्हणे ती तेंव्हा माधवास। काय कारण पुसण्याचे।।५६।। म्हणे तू असशी सुंदरी। दाटला काम मम अंतरी। झालो मोहीत तुजवरी। सांग तुझे नाम खूण।।५७।। म्हणाली सुंदरी तयासी। आपण कोण सांगा मजसी। विप्र म्हणे मग तिजसी। माधस नामे मी ब्राह्मण।।५८।। पाहून सुंदर तुझे वदन। मन माझे गेले मोहून। आला काम उचंबळून। झालो आतुर तुजसाठी।।५९।। यावरी म्हणे ती अबला। नाम असे माझे कुंथळा। चांडाळ जातीची मी अमंगला। माझा विटाळ न व्हावा।।६०।। तुम्ही उच्चवर्णी ब्राह्मण। आमुचे नुसते शब्द ऐकोन। करावे तुम्ही सचैल स्नान। वेदशास्त्र जाणता तुम्ही।।६१।। माधव म्हणे तू चांडाळीण। सदा पवित्र असे स्त्रीरत्न। जातीचे तेथे काय कारण। तू असशी सौंदर्य रत्न।।६२।। म्हणे ती धर्मपत्नी त्यागून। माता - पित्यांसी घरी सोडून। मी तर जातीची चांडाळीण। कैसा इच्छिता संग माझा।।६३।। म्हणे तेंव्हा तिज विप्र। नाही येथे विप्रपणाचे काज। हासोत समस्त लोक मज। न लगे कोणीच मज आता।।६४।। असो ऐसा माधव विप्रासी। संग घडला चांडाळणीशी। गेले त्याचे विप्रत्व तिच्यापायी। राहीला तिजसवे

अंत्यज होऊन।।६५।। विसरला तो जपतपानुष्ठान। नाठावे वेदशास्त्र अन् अध्ययन। शौच, सत्कर्म, सद्वर्तन। विसरला माधव देवतार्चन।।६६।। कर्म तयाचे कैसे बळवंत। असूनी स्वतः विप्र शुचिर्भूत। वेदशास्त्रामाजी असोन पारंगत। कुमार्गासी तो लागला।।६७।। स्त्रीसंगाचा पडता मोह। दाटला कामविकार व्योमोह। परस्त्री संग असे अमंगळ। अध:पात जीवनी होतसे।।६८।। माधव रतला चांडाळणीसी। विसरला आपुले पत्नीसी। वर्ष त्याची सरती पळा ऐसी। चांडाळणी सवे विप्रासी।।६९।। मातापिता झाले दु:खित। चंद्रलेखा शोक करी बहुत। पति वियोगे झाले जीवन व्यर्थ। जाहला अनर्थ केव्हढा।।७०।। पुरंदर वेद शास्त्र संपन्न विप्र। होता तयासी एकची पुत्र। असेल पूर्व कर्माचे हे फळ। लागले भोगावे तयांसी।।७१।। येरीकडे तो माधव विप्र। रतला कुंथळेसी अहोरात्र। ना ठावे तयासी अन्य विचार। जाहला पिसा स्त्री कारणें।।७२।। सरली ऐसी द्वादश वर्ष। वर्ष मास दिवस सरत। परी दैवयोगे अकस्मात। मरण पावली कुंथळा।।७३।। करी माधव शोक अती। मुखे घालीतसे तो माती। रतलो मी तुज संगती। सोडीले माय - बाप - पत्नी।।७४।। मायबाप सर्व होते त्यागीले। कुंथळेविना सदन शून्य वाटे। अन्ननीर न गोड लागे। तळमळतसे विरहे माधव।।७५।। मग विचार करी मनी। नसे संसार या जीवनी। जावे देशांतरी विरक्त होऊनी। नसे अन्य उपाय मजसी।।७६।। जाहला मग

पश्चाताप। केले मीच महापाप। सोडला स्वधर्म आणि स्वकर्म। भलते कर्मी रत जाहलो।।७७।। द्विजयातीत जाहला जन्म। झालो होतो शास्त्र संपन्न। परी सोडोनी सुविचार पूर्ण। अघोर कर्मासी मी लागलो।।७८।। आता असिपत्रादि नरक दारुण। भोगणे लागे मज लागून। ऐशा भयंकर दुःखापासून। सोडवील कोण मजसी।।७९।। जाऊ कोणासी मी शरण। धरु कुणाचे मी चरण। तळमळतसे दुःखे तो ब्राह्मण। संसार शून्य वाटे त्यासी।।८०।। ऐसा जाहला परम दुःखित। नसे त्यास सहारा अरण्यात। जाहला होता तो हीनदीन। नवल अपूर्व घडले तेथे।।८१।। दूरदेशस्य राजे बहुत। होते जात यात्रे निमित्त। दैवयोगे भेटले माधवास। कुतुहल माधवास वाटले।।८२।। माधव पुसतसे तयांसी। चालला कोणते मार्गासी। ते म्हणती जातो तीर्थासी। पहावया त्या शेषाद्रिसी।।८३।। ऐकून तयांचे ऐसे वचन। माधवास जाहला परमानंद। म्हणे यांची संगती धरुन। करावी तीर्थयात्रा आपणही।।८४।। विचार ऐसा करुन मनी। चालला त्यांचा संग धरुनी। तयांपुढे निवेदन करुनी। माधवे आपुले कर्म कथिले।।८५।। ते माधवासी मग सांगती। शेषाचलाची असे महती। तेणे सर्व पापे नाश पावती। महिमा तयाचा असे अगाध।।८६।। त्यांच्या समवेत माधव निघाला। त्यांनी नगोत्तम महिमा कथिला। महिमा ऐकूनी आनंदित झाला। माधव अत्यंत मानसी।।८७।। भोजन करती ते सर्व। उच्छिष्ट बाहेर

टाकती सर्व। त्यातील अन्न करुनी एकत्र। माधव भोजन करीतसे।।८८।। सारे पातले स्वामीतीर्थासी। माधव होता संगती तयांसी। करुन वपन केले स्नानासी। यथाशास्त्र केले पिंडदान।।८९।। घडिले तेणे अत्यंत पुण्य। गेले महादोष गळून पूर्ण। जाहले तृप्त सारे पितृगण। माधव ब्राह्मणाचे तये वेळी।।९०।। मग ते सर्व राजेगण। चढू लागले पर्वत श्रेष्ठ। माधव होता तयां बरोबर। तोही चढतसे पर्वतासी।।९१।। पर्वत स्पर्श होता तयासी। तेथेच वमन झाले माधवासी। सकळ पापे गेली त्यासरशी। झाला माधव निष्पाप।।९२।। ऐसा तो माधव विप्र। जाहला पर्वत स्पर्शी निष्पाप। सकल करती बहु आश्चर्य। केव्हढा पापी उध्दरला।।९३।। ब्रह्मा, इंद्र अणि रुद्रगण। नेमे येती पर्वत दर्शन लागून। निष्पाप द्विजवरसी पाहोन। परमेष्टी तयासी बोलला।।९४।। तू स्वामि तीर्थी करुन स्नान। घेऊनी वराहाचे दर्शन। त्याचे समीप करी देह अर्पण। होशील पुण्यवंत द्विजा तू।।९५।। पुढील जन्मीच साचार। आकाशनामें होशील नृपवर। परम पुण्यशील पुण्ययुक्त। जन्म येईल तुजलागी।।९६।। त्या जन्मी तुझिया उदरी। येईल जगद्‌वंद्याची अंतुरी। वैकुण्ठवासी प्रत्यक्ष श्रीहरी। होईल तुझा जामात।।९७।। उध्दार तुझ्या सकळ कुळाचा। पर्वत दर्शने असे झाला। ऐसे बोलून विधि निघाला। जाऊनी पोचला स्वस्थाना।।९८।। वें नाम दोष दारुण। स्पर्शमात्रें नासले जाण। यालागी वेंकटागिरी अभिधान। पर्वतासी

त्या लाभले।।९९।। जनकासी सांगे मुनिवर। ऐसी ही कथा बहु सुंदर। ही ऐकताची भक्तियुक्त। हरतील तयाची सर्व दुःख।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय चवथा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

व्यंकटेशा तुझा महिमा अगाध। असे रसपूर्ण तो मधाळ। वर्णिण्यासी मी झालो उद्युक्त। असावी श्रीहरी तव कृपा।।१।। स्वामींचा असे वरदहस्त। वरी तव कृपा प्रसाद। त्यातून लाभे सामर्थ्य। ग्रंथ पुढे चालविण्यासी।।२।। व्यंकटगिरीचे महात्म्य थोर। कथिले असे सर्व साचार। परी तेथे रमा माधव संचार। झाला कैसा ते सांगतो।।३।। एकदा सर्व ऋषी मिळोन। जान्हवी तीरी करिती यज्ञ। यज्ञ मंडप उभारिला शोभयमान। तयांनी कौतुके होता रचिला।।४।। कश्यपात्रि, भारद्वाज। विश्वामित्र, गौतम तेजःपुंज। जमदग्नि, वसिष्ठादि द्विज। सारे मिळाले एके ठायी।।५।। नारद कमलोद्‌भव सुत। अचानक पातला तेथ। पाहुन नारदऋषींसी। आदरे तयांसी सर्व वंदिती।।६।। नारद पुसतसे त्या ऋषींसी। आरंभिले तुम्ही यज्ञासी। परी या यज्ञाचे फळ कोणासी। अर्पिले असे ते सांगावे।।७।। याचे श्रेय अर्पावे कोणासी। नसे ठाऊक ते आम्हासी। अद्यापि केले नसे निश्चिती। कैसे सांगू तुम्हासी।।८।।

नारद म्हणती मग तयांसी। न जाणता यज्ञ भोक्त्यासी। आरंभिले कैसे तुम्ही यज्ञासी। यज्ञाचे मग प्रयोजन काय।।९।। सारे द्विज मग विचार करती। बोलविती ते भृगुऋषींसी। म्हणती जाऊनी स्वर्गलोकासी। श्रेष्ठ देव कोण ते पहावे।।१०।। ऐकोनी तयांचे बोलासी। भृगुऋषी गेले सत्यलोकी। कमळासन बैसला सभेसी। नारद, तुंबर करिती गायन।।११।। सावित्री आणि सरस्वती। उभ्या सान्निध सेवेसी। गंधर्व मधुर गायन करिती। होती ब्रह्मसभा अपूर्व।।१२।। गेले सभेत भृगुऋषी। परी कोणी न पुसे त्यांसी। पाहून विचार करती ऋषी। नसे हा यज्ञभोक्ता होण्या योग्य।।१३।। तेथुनी मुनी आले कैलासी। गिरजेसह शिव होते एकांती। ऋषी आत प्रवेश करीती। झाली पार्वती लज्जित।।१४।। ऋषींसी पाहून कोपायमान। जाहला तो भाल लोचन। म्हणे संचरला कसा अवचित। मारीन मी यास आता।।१५।। ऋषी शाप देती शिवा लागुनी। तुझी पूजा न करील कोणी। आज पासोनी तुझिया लिंगासी। पूजतील सर्व निश्चिती।।१६।। तेथोनी पातला ऋषी वैकुण्ठासी। एकांती लक्ष्मीसह हृषीकेशी। परम कोपाविष्ठ झाला ऋषी। श्रीहरीस लत्ताप्रहारे ताडीले।।१७।। तात्काळ उठीला जगज्जीवन। धरीले तयाने ऋषिचरण। म्हणे स्वामी तुम्ही मजकारण। कष्ट बहुत पावला असी।।१८।। म्हणे मी अपराधी पूर्ण। मम तनु वज्राहूनी कठीण। आहेत आपुले मृदु चरण। असतील दुखावले मुनिवर्या।।१९।।

सुगंध तेल चरणासी लावून। करी श्रीहरी स्वहस्ते मर्दन। मग करी उष्णोदके चरणक्षालन। वस्त्रे पुसून चरण चुरीतसे।।२०।। म्हणती ऋषी हा सत्वगुणयुक्त। देवाधिदेव हा वैकुण्ठनाथ। त्रिभुवनपालक हा समर्थ। वेदशास्त्र ही करीती वर्णन।।२१।। हात जोडोनी करुनी नमन। स्तविती ऋषी जगन्नाथास। म्हणती भक्तवत्सल विश्वव्यापक। दानवकुळपावक श्रीहरि।।२२।। श्रीहरीसी ऐसे स्तवून। परत येती ऋषी वेगे करुन। म्हणती देवात श्रीहरि उत्तम। तोची यज्ञभोक्ता यथार्थ।।२३।। मानती मुनिजन ऋषिवचन। करीती ते महायज्ञ। महायज्ञ जनार्दनासी अर्पून। जाहले संतुष्ट ते काळी।।२४।। कमलेने पाहीले हरिवर्तन। केले तयाने भूसुर पूजन। कोपली ती क्रोधावेगे करुन। श्रीहरीसी ती बोलतसे।।२५।। तुम्ही समर्थ सर्व देवामाजी। ऋषी पदप्रहारे ताडन करी। पाहूनी तुम्हासी हो श्रीहरि। कोप कैसा नच आला।।२६।। ऐकोनी ऐसे कमलावचन। म्हणे तिजसी रमारमण। भृगुऋषी नसे केवळ ब्राह्मण। तपोधन ज्ञानी तो असे।।२७।। द्विजवर असती मम दैवत। मी भक्तामाजी प्रिय अत्यंत। भक्तिविना प्रिय नसे अन्य। भक्तवत्सल मी साक्षात।।२८।। या करिता सांगतो प्रिये तुज। हृदयी मिरविता विप्र चरण। साक्षात भूषण ते मजकारण। श्रीवत्सलांच्छन मी शोभे।।२९।। यावरी कमला होतसे क्रोधित। म्हणे मी भूतळा जाते त्वरीत। जगन्माता निघाली मग तेथून। भू वर करवीर क्षेत्री आली।।३०।।

जगन्माता जाता निघूनी। बहु खिन्न झाला हरी मनी। वैकुण्ठाचा मग त्याग करुनी। भूतळावरी श्रीहरी पातला।।३१।। भागीरथीच्या दक्षिण किनारी। तीनशे योजन अंतरावरी। तीर्थक्षेत्र असे सुवर्ण मुखरी। प्रवरा नदी तेथ असे।।३२।। त्या तीर्थक्षेत्राचे उत्तरदिशी। नाम जयाचे वेंकटगिरी। शतयोजन लांब पर्वत निर्धारी। त्रिंश योजन रुंदी जयाची।।३३।। भुवैकुण्ठच जणु तो वेंकटेशगिरी। पाहुनी हर्षिला वैकुण्ठविहारी। स्वामी पुष्करणी तीरी। येता झाला इंदिरा रमण।।३४।। सभोवती वन परमसुंदर। नाना वृक्ष लता मनोहर। तयांची छाया शीतल सुंदर। मनोल्हाददायक रम्य परिसर।।३५।। पृथ्वी वरील सकल तीर्थ। असती येथे निरंतर। ऐसे पावन क्षेत्रे पाहून। तेथेची राहणे इच्छितसे।।३६।। त्या तीर्थासमीप सुरेख। तिंतिणी वृक्ष असे एक। तया खाली असे वाल्मीक। तया अंतरी मुरारी प्रवेशला।।३७।। मनात चिंततसे रामावतार। म्हणे वाल्मिक हेच कौसल्या सुंदर। तिंतिणी वृक्ष प्रत्यक्ष दशरथ। तीर्थ जणु सरयु गंगा।।३८।। दशसहस्र वर्षा पर्यंत। राहतसे हरी तेथे गुप्त। चिंताक्रांत देव समस्त। म्हणती गेला कुठे श्रीहरी।।३९।। मग सर्व देव एकत्र मिळून। जाती जेथे होते कमलासन। म्हणती शोधा हरिसी त्वरे करुन। जाहलो बहु चिंतीत आम्ही।।४०।। होई ब्रह्मा चिंताग्रस्त मनी। मग सर्व करवीरासी जावोनी। म्हणती तीजसी आलीस रुसोनी। श्रीहरि वैकुण्ठ सोडून गेला।।४१।। मग त्या

सकल देवांसमवेत। जगन्माताही हरीसी शोधत। गेला असे कोठे जगन्नाथ। ठाव पत्ता नसे तयाचा ।।४२।। जो वेदाशास्त्रांसही अगोचर। अष्टदश पुराणांसी पार। सहस्रमुखे असूनही शेष। वर्णन तयाचे करु न शके।।४३।। नाना व्रते योग साधन। करीताही न सापडे रमारमण। केले जरी पंचाग्निसाधन। नारायण न सापडे कोणासी।।४४।। द्रव्य बळें विद्याबळे जाण। यज्ञयागही करीता बहुत। परी न सापडे दीनानाथ। ठाव तयाचा न लागतसे।।४५।। दृढभक्ती असता पूर्ण। होई नारायण बहु प्रसन्न। लक्ष्मी सहीत स्वत: येऊन। निवास करी तयाचे घरी।।४६।। जगन्माता आणि स्वयं शंकर। आला शोधण्या चतुरानन। परी न सापडे तया इंदिरारमण। बहु कष्ट झाले सर्व।।४७।। मग सर्व करीती एकत्र विचार। गोरुप धारण करी चतुरानन। जगन्माता गोपीवेश करी धारण। वत्सवेश शंकर धरीतसे।।४८।। ऐसा वेष तिघे धारण करुन। निघाले हरीस शोधण्या लागून। चोळरायाचे राज्यात तिघे जण। हिंडत हिंडत पोहोचले।।४९।। चोळदेशीचा तो नृपवर। सक्रियाशील आणि उदार। गोब्राह्मण प्रतिपालक थोर। प्रजापालनी तत्पर असे।।५०।। तिघेही पातले त्याचे नगरात। धेनु सलक्षण पाहती सकळ। करीती सारे मनी आश्चर्य। कोणते देशीची असे धेनु।।५१।। नृपासी कळले हे वृत्त। सभेत आणविली त्वरीत। गौळणीस पूसे नृपनाथ। धेनु कोणते कारणे आणली।।५२।। उत्तर देतसे

तदा गौळणी। म्हणे ऐक बा नृप चुडामणी। असे ही धेनु उत्तम गुणी। विकणेसाठी असे आणली।।५३।। देवोनी यथेष्ट धन तियेसी। घेतले विकत गायीसी। वत्सासहित तिज बांधली। नेऊनी आपले कळपात।।५४।। जगन्माता गुप्त होतसे। सर्व गोधन घेऊन चरावयाते। गोपाळ चोळरायाचा वनी जातसे। नित्यनेमे तेधवा।।५५।। चरावयाचे निमित्त करुन। पृथ्वीत शोधतसे चतुरानन। म्हणे असे कोठे इंदिरारमण। ठाव तयाचा न सापडे।।५६।। ऐसेच जाती काही दिवस। श्री वेंकटाद्रि गिरीपर्वतावर। चरावयास आपुले गोधन। गेला घेऊन गोपाळ।।५७।। भक्षिले तेथील बहुत गवत। मग पाजण्या तयांसी जल। स्वामी तीर्थाची नेतसे गोपाळ। करीतसे गोधन जलपान।।५८।। सारे वृक्षछायेत विसावती। अस्वस्थ असे कमलासन मनी। भूमीत हरीचा शोध करी। तया तीर्थासमीप।।५९।। देखिला त्याने तिंतिणी वृक्ष। तयाखाली होते वाल्मीक। तयाचे छिद्रातून सुवास येत। श्री लक्ष्मीरमण तनुचा।।६०।। ओळखतसे खूण चतुरानन। म्हणे वाल्मिकाभीतरी रमारमण। झाला हर्षित कमलासन। म्हणे श्रीहरि येथेची वसतसे।।६१।। मग तया वाल्मिकावरी। दुग्धाभिषेक विधात करी। म्हणे जयजय वैकुण्ठविहारी। एकांत ऐसा सेविलासे।।६२।। ऐसा नित्य चतुरानन। नित्य तेथ करी अभिषिंचन। गेले ऐसे कैक दिन। नवल एक वर्तले।।६३।। राजपत्नी एके दिवशी। आपण येई गायीपाशी। लागे

ती दोहन करावयासी। क्षीर कणभरही न मिळे।।६४।। पूसतसे ती गोपाळासी। वनांतरी पाजविले का वत्सासी। का तूची दुधिले या धेनुसी। गोपाळ किमीप न जाणतसे।।६५।। म्हणे तो आपुली चरण साक्ष। नाही दुधिले मी गायीस। न देखिले ती पाजी वत्सास। ठाऊक नसे मजकारण।।६६।। राज्ञी झाली बहु कोपयामान। करविले गोपाळास ताडन। म्हणे तू दूरात्मा दुर्जन। अभिलाषा दुधाची असे तुज।।६७।। जाहला गोपाळ सावधचित्त। नित्य तये गाईस जपत। गाईचे क्षीर काय होत। पाहण्यासाठी हे सर्वदा ।।६८।। एक दिनी तो गोपाळ। स्वामी तीर्थाचे नीर पाजून। केले वृक्षछायेत स्थिर गोधन। लक्ष ठेवी तो धेनुवरी।।६९।। पाहतसे तेंव्हा गोपाळ। धेनु दुग्धाभिषेक करी वाल्मिकावर। पाहुन गोपाळ झाला संतप्त। म्हणे ही धेनु बहु अवगुणी।।७०।। म्हणे मी करीन हीचा वध। धावला हस्ती फरश घेऊन। हस्त आपुला ऊर्ध्व उचलोन। घालण्यास ते गायीवरी।।७१।। हरी इकडे चिंतितसे मनी। वृत्तांत सर्व तो जाणूनी। म्हणे माझी काकुळती देखोनी। विधि अभिषेक नित्य करीतसे।।७२।। परी न जाणतसे गोपाळ। निघाला करण्या तो गोवध। मी तर भक्तवत्सल रक्षक। ब्रीद राखीले पाहीजे माझे।।७३।। ऐसा विचार करुनी अंतरी। जगदीश आला वारुळा बाहेरी। प्रकट झाला प्रत्यक्ष हरी। वाचविणेस स्वभक्ता।।७४।। प्रहार जो गायीवरी पडे। करी श्रीहरि निजांग पुढे। प्रहारे

त्या हरिमस्तक फुटे। उंचबळती रक्तचिंगारी।।७५।। देखुन ऐसे दृश्य भयंकर। गोपाळ मूर्च्छित पडे भू वर। गेला निघून त्याचा प्राण। गोपाळ मरण पावतसे।।७६।। देखोनी हे सारे निजनेत्रे। धेनु पळतसे राजाकडे। येऊन ती नृपा सम्मुखे। लोळो लागली भूवरी।।७७।। राजा पाठवितसे सेवकजन। पाहण्या काय वर्तमान। धेनु नेई तया वारुळासमीप। दिसे गोपाळाचे कलेवर।।७८।। वारुळाचे वरी सर्वत्र। सांडीले असे लाल रक्त। पाहून सेवक धावले त्वरीत। राजास वृत्त सांगण्यासी।।७९।। वृत्त ऐकून राय निघाला। वाल्मिका समीप तो पातला। वारळामधून हरि प्रगटला। घाये मस्तक फुटलेसे।।८०।। म्हणे तयासी मग इंदिरावर। मी एकलाची परदेशी राहत। तुवा माझे मस्तक फोडून। दारुण दुःख दिले मजसी।।८१।। होईल तू पिशाच झडकरी। हिंडत फिरशील वनांतरी। आहारही न मिळे तुजसी। भोगशील तू दुःख अपार।।८२।। राजा म्हणे हरे श्रीनिवासा। काय अपराध येथे माझा। निरपराध्यासी आपण दंडिता। भक्तवत्सल गोविंदा।।८३।। नाम तुमचे घेता मुखी। पापी घोर संसार तरती। मी पाहूनही प्रत्यक्ष मुखासी। पिशाच योनी मज कासया।।८४।। झालो मी घाये जर्जर। नकळत शापिले मी तुज। असे तव कर्मगती विचित्र। भोगल्याविण न सुटे।।८५।। आकाशनामा थोर नृपवर। होईल सोमवंशी साचार। तयाची कन्या परम सुंदर। वरीन मी तिजलागी।।८६।। देईल

तो मज मुकुट एक। घालिन मस्तकी तो मुकुट। दर्शनासी ये तेधवा निश्चित। क्षणमात्रे तू सुखी होशी।।८७।। ऐसा नृपास दिला उःशाप। जाहला गुप्त जनार्दन। राव मग पिशाच होवोन। वनांतरी त्या राहीला।।८८।। नारायण करी देवगुरु चिंतन। वाल्मिक माजी देवगुरु येत। म्हणती औदुंबर चीक अन् कार्पासराख। घायात एकत्र भरावी।।८९।। काही दिवसा नंतरी। औषधालागी फिरतसे मुरारी। मार्गी जाता वराहरुप श्रीहरी। त्याच मार्गे येतसे।।९०।। एकरुप ते दोघे जण। दोन अवतार भेद कैसा असेल। भार्गव आणि रघुनंदन जेवी मागील युगी भेटले।।९१।। वराहरुपी हरी विचारी। कासया सोडीली वैकुण्ठपुरी। कोणते कारणे आला भूवरी। सांगावे मज झडकरी।।९२।। बोले मग तो जगन्नाथ। भृगुने वक्षी मारली लाथ। इंदिरेस न सोसले मग। गेली रुसोन ती करवीर पुरी।।९३।। चोळरायाचा गोरक्षक। तेणे फोडले मम मस्तक। घाय बहुत व्यथा देत। दुःख ते मज न वर्णवे।।९४।। तरी बाबा या पर्वतावरी। भूमि पालका मज ठाव देई। वराह म्हणे आहो श्रीहरि। राहावे आपण अवश्य येथे।।९५।। वराहे भूमी दिधली त्यासी। दिधली बकुला नामें दासी। हरीची सेवा करण्यासी। गेला वराह स्वस्थानी।।९६।। शौनकादिक पूसती सूतासी। कोण असे ही बकुलादासी। सूत सांगती मग तयांसी। आठवावी नंद यशोदा।।९७।। यशोदेने देखिले लग्न सोहळे। हरी तेव्हा तिज बोले।

कलीयुगी मनोरथ जननीये। करीन पूर्ण मी सर्वथा।।९८।। तीच यशोदा झाली बकुला। मातेपरी सांभाळी हरीला। पाहील ती हरिविवाह सोहळा। अनुभवील आनंद सर्वथा।।९९।। ऐसी ही कथा बहु रसाळ। स्वामी कृपे होतसे साकार। वाचिता ऐकताची ती बहु सुंदर। सुखी व्हाल या कलियुगी।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

# ।।अध्याय पाचवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री व्यंकटेश कथा सुरम्य सुंदर। पावक जणु कृष्णा गंगाथोर। स्नान येथे करिता सकल। पापविमुक्त होती पै।।१।। ऐशी ही कथा वदविणार। स्वामी समर्थ महाराज। लिहीणार केवळ मी पामर। स्वामीभक्त मी गणेश।।२।। स्वामी चरणी होता लीन। प्रतिभेस येती शब्दकुसुम। तेणे वर्णितो व्यंकटेश महिमान। सर्वांसी विनम्र वंदन माझे।।३।। व्यंकटेश कथा हीच गंगा थोर। भक्ति, ज्ञान, वैराग्य, त्रय। हेची येथील थोर जलचर। स्नान करीता संचरे ज्ञान।।४।। पूर्वाध्यायी पाहीले आपण। बकुळेसहीत रमारमण। वेंकटाद्रिवरी तो लक्ष्मीरमण। राहतसे तो जगन्नाथ।।५।। बकुला व्यंकटेशमाता झाली। सेवा बहु करीतसे माऊली। आनंदे वर्तित होता वैकुण्ठविहारी। दिन ऐसेची होते जात।।६।। एके दिनी विचार करी मानसी। जावे क्रीडेसाठी वनासी। निघाला मृगयेस हृषीकेशी। सांगुनी बकुला मातेसी।।७।। मनी चिंतीतसे इंदिरा रमण। अश्वारुढ मी होवोन। करावे मी वनांतरी गमन। तो अश्व

तात्काळ प्रगटला।।८।। नेसले तयाने पीतवसन। मस्तकी रत्नखचित मुकुट। कर्णद्वयी कुंडले सुभट। ऐसा तो अश्वारुढ जाहला।।९।। निघाला मृगया करीत श्रीधर। करीतसे बहु प्राणी संहार। तो देखिला उन्मत्त कुंजर। व्यंकटेश तये पाठी निघाला।।१०।। कुंजर ऐसा पळत धावत। आले ते नारायणपुरासमीप। मग गज जाहला शरणागत। श्रीधर सन्मुख उभा राहीला।।११।। शरणागत वत्सल नारायण। न मारीला तेणे तो वारण। अकस्मात पाहीले उपवन। अति मनोहारी अतिसुंदर।।१२।। जाई जुई मालती शेवंती। सुमनभारे सारी शोभती। सरोवर दिव्य मध्यभागी। तीरी त्याचे मराळ खेळती।।१३।। ऐशा या सुंदर उपवनात। सुंदर कुमारी असंख्यात। ऐकून शौनकादि मुनिजन। सुतास ते प्रश्न पूसती।।१४।। व्यंकटेश देखिले उपवन। तेथे पाहील्या कन्या अनेक। त्या कोठील काय हे सर्व। सांगावे सर्व आम्हासी।।१५।। सुत म्हणे ऐका तुम्ही। पूर्वी द्वापाराचे अंती। पांडव - कौरव युध्द झाल्यावरी। पंडुसुत करीती शासन।।१६।। पांडव सकल गेले निजधामी। तैसेची विक्रमादि झाल्यावरी। सहस्रवर्षे सरल्या नंतरी। चंद्रवंशी जाहला नृपवर।।१७।। नाम त्याचे होते सुवीर। त्याचा पुत्र नामे सुधर्म। जाहले तया दोन पुत्र। आकाशराज अन् तोंडमान।।१८।। पूर्वी वर्णिला जो माधवविप्र। तोची जन्मला आकाशराज। होता नारायण भक्ति तत्पर। कृपा करीतसे सर्वांवरी।।१९।। चालवी राज्य बहुनीती।

न देतसे दुःख कोणाप्रती। एकच दुःख तयाचे मानसी। पोटी पुत्र नसे त्याचे।।२०।। मग आपल्या गुरुसी पाचारोन। राजा बोले खिन्न वचन। नाही देखिले मी पुत्रवदन। व्यर्थ असे मम जीवन।।२१।। मग गुरु तयास बोले वचन। प्राक्तन भोग हा दारुण। परी काहीतरी करावा उपाय। पुत्र उत्पत्ती होण्यास्तव।।२२।। जरी हरी होईल कृपावंत। अघटित ही घडे निश्चित। यास्तव शोक नको निश्चित। ऐक आता नृपश्रेष्ठा ।।२३।। गुरु म्हणती हरि प्रीत्यर्थ। पुत्र कामेष्टि करावा सत्य। त्यामुळे उत्तम पुत्र प्राप्त। होईल निश्चिती राजेंद्रा।।२४।। राजा म्हणे करीतो नक्की। आचार्यत्व करावे तुम्हीची। साधन सामग्री यज्ञाची। काय ती सांगा मजसी।।२५।। गुरु उत्तर देती तयासी। करावी प्रथम भूमि शुध्दि। तयासाठी तू आधी। करवी नांगर सुवर्णाचा।।२६।। भूमि नांगरोन घ्यावी। परीपूर्ण ती शुध्द करावी। मग मंडप रचून त्यावरी। कुंड वेदिका करावी।।२७।। ऐशी सर्व तयारी करावी। पूर्ण होता येईन लगबगी। यथाशास्त्र करवीन सारे काही। नको चिंता महाराजा।।२८।। राजाने आज्ञापिला प्रधान। घेतला सुवर्ण नांगर बनवून। मग पाहुन सुमुहुर्त शोधून। भूशोधना केला प्रारंभ।।२९।। नांगरिता भूमि नृपाळ। निघाले भूमितून सुवर्ण कमळ। कमळगर्भी असे कन्यारत्न। राव परम हर्षित झाला।।३०।। षण्मासाची सुकुमार कुमारी। तेजाची अलौकिक झळाळी। आकर्ण नयन स्वरुप सुंदरी। राव म्हणे

ही रमापति कृपा।।३१।। राव प्रेमे उचली कन्येस। तव आकाशवाणी बोलत। राजा ऐक सावध चित्त। परम भाग्यवान तू असशी।।३२।। राया करी हीचे पालण। आहे अलौकिक हे कन्यारत्न। प्रत्यक्ष व्यंकटेश येऊन। करील अंगिकार हीचा।।३३।। ऐकून वाणी राजेंद्र। उचंबळे त्याचे हृदि मोद समुद्र। घेऊन कन्या तो सत्वर। निजमंदिरी आला।।३४।। कांतेस म्हणे राजा आनंदुन। म्हणे जाहला बघ हरि प्रसन्न। दिधले आपणा कन्यारत्न। साक्षात इंदिराच अवतरली।।३५।। ऐकूनी रायाचे हर्षवचन। धरणीदेवी जाहली बहु प्रसन्न। आनंदाश्रुनी ओसंडती नयन। म्हणे नगरात शर्करा वाटावी।।३६।। पद्मामध्ये जाहला जन्म। तेणे असावे पद्मावती नाम। ऐसे नामकरण तिचे करुन। जाहले उभय हर्षभरीत।।३७।। जैसा शुध्द द्वितीयेचा चंद्र। वाढू लागली कन्या सुंदर। बहु सुलक्ष्मणी कन्या कोमल। सौंदर्य अनुपम तियेचे।।३८।। ऐशी सुंदर जैसी चित्कळा। अवतरली साक्षात कमला। वाढता वाढे जैशा चंद्रकला। झाली उपवर पद्मावती।।३९।। कन्येचा पायगुण सुलक्षण। राजपत्नी जाहली गर्भिण। गर्भचिह्ने दिसताची पूर्ण। राया मनी बहु तोषला।।४०।। नवमास भरताची ते वेळी। उत्तम लग्न उत्तम काळी। राजपत्नी प्रसून जाहली। पुत्र तियेसी जाहला।।४१।। जातकर्मादि विधी करुन। नाम ठेविले वसुदान। गोभूमी हिरण्यदान। विप्रांसी बहुत दीधले।।४२।। असो उपवर झाली राजकुमारी। राया

झाला चिंतातुर मनी। इयेसी योग्य वर कोठोनी। मिळेल काहीच कळेना।।४३।। ऐकदिनी राजसबाळी। होती खेळत उपवनी। प्रगटला तेव्हा नारदमुनी। वृध्द ब्राह्मण वेष धरुनी।।४४।। देखिली पद्मावती नयनी। जैसी मेघमंडली सौदामिनि। विशेष असे मृगमदाहूनी। परीमळ अंगी तियेच्या।।४५।। पद्मावतीस ऐशी पाहुनी। म्हणे बाळे प्रत्यक्ष सौदामिनी। पाहीन तवहस्त ये वेळी। दाखवी मजसी आताची।।४६।। सामुद्रिक चिन्ह पाहून। सांगेन मी तुझे लक्षण। कन्या म्हणे तुज लागून। हस्त का बरे दाखवावा।।४७।। तू असशील कोणाचा कोण। मम हस्त पाहण्याचे काय कारण। नारद म्हणे मी ब्राह्मण। पाहीन हस्त माते तुझे।।४८।। मग येऊन समीप ते वेळी। वंदन करी ब्राह्मण चरणी। वामहस्त तयास दाखवी। नारद हस्त पाहतसे।।४९।। म्हणे स्वस्तिक चिह्न मंडीत। असे इयेचा सुलक्षणी हस्त। ही असे इंदिरा साक्षात। कलीयुगामाजी अवतराली।।५०।। नारद म्हणे मग तिजसी। श्रीहरि नवरा होईल तुजसी। भक्तप्रिय जगन्नाथ तव पती। बहु भाग्यवती तू कुमारी।।५१।। ब्राह्मणरुपी नारद वचन। ऐकोन पद्मावती झाली प्रसन्न। मग तयाचे वंदून चरण। गेली सदनासी आपुल्या।।५२।। कोणासही न सांगितले तिने। परी मनात ती चिंतितसे। चरण हे श्रीव्यंकटेशाचे। कैसे प्राप्त होतील मज।।५३।। आपुल्या सकल सख्यां समवेत। नित्य उपवनी ती येत। क्रीडा करीतसे तयां समवेत। परमानंदे पद्मावती।।५४।।

एके दिनी त्या उपवनी। सख्यांसहीत पद्मावती। मनसोक्त क्रीडा करण्यासी। आली होती त्या वनी।।५५।। पहा मागील कथानक। श्री व्यंकटेश मृगये लागून। आला त्या सुंदर उपवनात। पाहतसे उपवन कौतुके।।५६।। पाहीले तयाने त्या स्थानी। कन्या अनेक क्रीडती वनी। तयांमध्ये विद्युल्लतेसम तेजस्वी। तळपतसे सख्यांमध्ये तेंव्हा।।५७।। पाहुन सुंदर पद्मावतीस। हर्षिले व्यंकटेशाचे चित्त। म्हणे रुप हीचे असे विशेष। पृथ्वीवर उपमा नसे तियेसी।।५८।। पद्मावतीही अकस्मात। पाहती झाली श्रीहरिमुख। श्यामल सुंदर दैदीप्यवंत। वेधले तेणे पद्मावतीचे मन।।५९।। काय करावे न कळे तिजसी। म्हणे हा पुरुष कोण असे की। सांगे मग ती सखियांसी। कोण कोठील विचारा त्यासी।।६०।। मग सख्या पुढे येती। पुसती ती व्यंकटेशासी। कोण कोठील तुम्ही म्हणती। काय निमित्त इथे आलासी।।६१।। सांगा कोण मात-पिता। कोणते स्थानीं तुम्ही राहता। नाम खूण सर्वही सांगा। आम्हा लागी आताची।।६२।। ऐकून सखियांचे बोल। व्यंकटेश जो अश्वारुढ। आला पद्मावती समो। वृत्त आपुले सांगे तिज।।६३।। म्हणे कमलवदने ऐक। माझा असे सोमवंश। वसुदेव असे माझा जनक। जननी माझी देवकीमाता।।६४।। आमचा बंधु असे बलभद्र। भगिनी माझी सुभद्रा नाम। अर्जुन आमुचा शालक। पांडव असती माझे बांधव।।६५।। माझे अभिधान श्रीकृष्ण। कन्यार्थी

आलो येथे जाण। आता तुझे वर्तमान। सकल सांग तू सुंदरी।।६६।। ती म्हणे मी असे सोमवंशी। आकाशराज विख्यात नृपती। असे मी कन्या तयाची। नाम माझे पद्मावती।।६७।। मग व्यंकटेश म्हणे तिजसी। आलो येथे कन्येसाठी। स्वरुप तुझे पाहुन अलौकीकी। मानस माझे वेधले।।६८।। तुझे सौंदर्य असे अनुपम। मानससिंधु येई उचंबळून। आता तू वरी मज लागून। करी मनोरथ पूर्ण माझे।।६९।। ऐकून व्यंकटेशाचे बोल। झाली पद्मावती क्रोधित। म्हणे आताची जावे येथून। येथे मुळी उभे नये राहू।।७०।। किराता म्हणे पद्मावती। जरी पडेल रायाच्या कानी। होईल क्रोधित तो झणी। मुकशील तू प्राणांसी।।७१।। हरी मग म्हणे तिजसी। मी सकाम आलो तुजपाशी। वरी वरानने तू मजसी। मम मनोरथ पूर्ण होतील।।७२।। क्रोधे मग पद्मावती। निघे सखियांसह जाण्यासी। जाता पाहून तियेसी। व्यंकटेश पाठी चालीला।।७३।। कन्या पाहती येतो पाठीशी। पाषाण प्रहार त्यावर करती। पडिला अश्व पाषाण प्रहारी। गेल्या कन्या निघोनी।।७४।। झाले भ्रमित हरीचे मन। मग अश्व तेथेच सोडोन। निघाला उत्तरपंथे चालत। येऊनी स्वस्थानी पातला।।७५।। हरी असे बहु चिंताक्रांत। शोक व्याकुळ झाला मनात। पाहुनी तयाच्या अवस्थेस। बकुला तयासी पुसतसे।।७६।। बकुला म्हणे श्रीहरीसी। कोणते दु:ख झाले तुजसी। खंती किमर्थ करितोसी। सांग मजसी जगन्नाथा।।७७।।

हरी बोले मग मातेसी। मृगयानिमित्ते गेलो वनासी। हिंडत गेलो नारायणपुरासी। उपवन सुंदर तिथे पाहीले।।७८।। उपवन होते शोभिवंत। होत्या कन्या तेथे खेळत। तयामजी बहु लावण्यवंत। एक कन्या तेथे देखिली।।७९।। पाहीले तियेचे अलौकिक सौंदर्य। मन माझे गेले मोहून। चित्त माझे गेले गुंतुन। तिजपाशी जाण सर्वथा।।८०।। मी पुसिले तिये लागून। सांगितले तियेने वर्तमान। सोमवंशी आकाश नृपवर। तयाची कन्या पद्मावती।।८१।। मी सांगितले तिजसी। चित्त गुंतले तुजपाशी। नच वश झाली मजसी। तेथून आलो मी परत।।८२।। तिचे प्रेमे गुंतले मन। नकोच वाटे भोजन शयन। जरी न मिळेल ती मज लागून। प्राण त्याग मी करीन।।८३।। बकुला म्हणे मग त्यासी। चिंता तू कशास करशी। जाऊन आकाश नृपापाशी। सांगेन कन्या द्यावी तुजसी।।८४।। व्यंकटेश मग म्हणे बकुळेसी। सत्यची तू माय असशी। जाई झणी त्या राजापाशी। करावी विवाह निश्चिती।।८५।। ऐकून बकुला म्हणे त्यासी। तुझीच असे ती मुळ प्रकृती। म्हणूनच आवडली तुज श्रीपती। पूर्व वृत्तांत सांग मजसी।।८६।। व्यंकटेश मग बोले हसून। म्हणे ऐक बकुले सावधान। पूर्वी त्रेतायुगामाजी जाण। श्रीराम रुप मी होतो।।८७।। पितृवचनाचे कारण। पंचवटीस केला वास। सीता-सौमित्रा समवेत। राहीलो त्या काननात।।८८।। सीतेस हरण्या रावण। आला भिक्षा मिसे करुन। मग अग्नी

जानकीस घेऊन। पाताळलोकी आला।।८९।। रावण पाठलाग करी। गेला तो पाताळामाजी। तेंव्हा गुप्त होऊन जानकी। अग्निमध्ये लपून राहीली।।९०।। अग्नीने तयाच्या कन्येस। दिले जानकीचे रुप सगुण। तियेस जानकी म्हणोन। रावणे नेली उचलोन।।९१।। श्रीरामे मग जाऊन लंकेसी। रावणाचा वध केला मगसी। नंतर जगदात्मा अयोध्यापती। सीतेलागी आणवीतसे।।९२।। अग्निदिव्य केले जानकीने। अग्निमाजी तिची दोन रुपे। देखिली प्रत्यक्ष राघवेंद्रे। जानकीस कारण तो विचारी।।९३।। जानकी म्हणे माझे कारणे। मम रुप धारण केले वेदवतीने। मीच मानून लंकापतीने। केले हरण वेदवतीचे।।९४।। अग्निपाशी मी सुरक्षित। परी षण्मासावरी कष्ट। वेदवतीने भोगिले प्रत्यक्ष। अग्निकन्या असे ही।।९५।। तरी आता हे श्रीरामा। मजसह हीचा अंगिकार करावा। तेव्हा श्रीराम तिज बोलला। मी असे एक पत्नीव्रत।।९६।। कलीयुगा माझारी हे होईल। प्रकटेन मी होऊन व्यंकटेश। सोमवंशी आकाशराजा नाम। त्याची कन्या ही होईल।।९७।। तीच असे ही पद्मावती। गुंतले मम चित्त तियेपाशी। राजाप्रती तू जाऊन वेगी। विवाह निश्चिती करावी।।९८।। बकुला आली आज्ञा घेवोनी। पाहीले तिने शिवमंदिर। घेतले तियेने शिवदर्शन। पद्मावती सख्या तेथे होत्या।।९९।। एकमेकीसी त्या सांगत असती। झाली विरहव्याकुळ पद्मावती। ऐकून बकुला पूसे तयांसी। सर्व वृत्तांत त्या

सांगती।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय सहावा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय श्री स्वामी समर्था। श्री व्यंकटेशच प्रत्यक्ष कृपा। शरण मी तव चरणकमला। द्यावी मती मजसी आता।।१।। जय जय श्री जानकीशः। व्यंकटेशा सुराध्यक्षा। स्वामी तीर्थतीरी निवासकः। भक्तवत्सला लक्ष्मीरमणा।।२।। तुझी लीला तूची वर्णावी। मम जड मती ती केवी। शब्द कुसुमे डवराव्या वेली। व्यंकटेशा तव महिमा गाता।।३।। आता पहा कथा पुढती। आली बकुला नारायण पुरासी। शिवालयी तेथे भेटल्या तियेसी। पद्मावतीच्या सर्व सख्या।।४।। बकुला पुसे वृत्तांत त्यांसी। कन्या सांगती वृत्तांत तियेसी। म्हणती आकाशरायाची। कन्या पद्मावती बहु सुंदर।।५।। एके दिनी आम्ही सकल। गेलो उपवनी पद्मावतीसह। एक पुरुष आला अवचित। किरात रुपात होता तो।।६।। मनोहर वदन श्यामसुंदर। कर्णी कुंडले प्रसाधन। विलोकिता त्याचे वदन। वेधले पद्मावतीचे नयन।।७।। पूसिले तयासी वर्तमान। सांगे तो पद्मावती लागून। पद्मावतीचेही अभिधान। पूसिले तयाने सर्वथा।।८।।

मग तो म्हणाला पद्मावतीसी। मी मोहून गेलो तव रुपासी। 'वरी मज' विनविती तुजसी। ऐकून कोपली पद्मावती।।९।। निघाली झडकरी ती स्वगृहाकडे। निघालो आम्हीही तिजसवे। परी तो येई पाठीमागे। वर्षिले पाषाण तयावरी।।१०।। आलो आम्ही स्वमंदिरासी। परी पद्मावती विव्हळ मानसी। न करी भाषण ती कोणासी। मूर्च्छित होऊन ती पडली।।११।। धावून आला तेव्हां नृपाळ। राजपत्नीही शोक करीत। आणिले बोलावून वैद्यास। वैद्य तिची नाडी पाहती।।१२।। वैद्य म्हणे असे पित्तप्रकोप। ज्योतिषी म्हणती ग्रहपीडा हीस। ऐकून करविती जप, दान। करविती उपाय पद्मावतीसाठी।।१३।। राया झाला चिंताक्रांत। बोलाविले त्याने राजगुरुस। राजगुरु म्हणती राजास। करावा अभिषेक शिवासी।।१४।। कन्या पुसती मग बकुलेस। तू कोणची कोण आहेस। झाली बकुला हर्षयुक्त। म्हणे मी दासी व्यंकटेशाची।।१५।। कन्या सांगती बकुलेसी। आत न सोडती कोणासी। नगरस्त्रिया जातील ते वेळी। जाई तू तिच्या दर्शनासी।।१६।। इकडे वेंकटगिरीवरी रमानाथ। म्हणे बकुलेस करावे सहाय्य। म्हणून घेतला पुलंदिनी वेष। विधीसी म्हणे तू बालक होई।।१७।। नेसले हरीने चीरवस्त्र मलीन। फाटकी कंचुकी लेऊन। निघाला बालक ओटीत घेऊन। कृश बालक रुदन करीतसे।।१८।। ऐसे शीशुस ओटी घेऊन। नाचत निघाली स्वच्छंदे करुन। ऐसीच नारायण पुरा लागुन। धर्मदेवी ती

आली।।१९।। सांगतसे ती सर्वांप्रती। कारणानिमित्ते आले या ग्रामी। आले नरनारायण आश्रमातूनी। करीन पूर्ण मनोरथ।।२०।। ऐकून तियेची वचनोक्ती। स्त्रिया बहु आश्चर्य करती। मग जाऊनी शीघ्रगती। सांगती वृत्तांत राज स्त्रियेसी।।२१।। ऐकून राजपत्नी हर्षली। राजपत्नी त्या स्त्रियांस म्हणाली। जाऊनी आणा धर्मदेवीसी। मजपाशी अविलंबे करुनी।।२२।। स्त्रिया सांगती धर्मदेवीसी। राजपत्नीने पाचारिले तुजशी। कन्या तिची नामे पद्मावती। असे जाहली व्याधिग्रस्त।।२३।। धर्मदेवी म्हणे तयांसी। मी ऐसी दरिद्रवेषी। सर्वथा श्रीमंताचे घरासी। दरिद्रयांनी असे जाऊ नये।।२४।। मग सर्व स्त्रिया मिळोनी। करती धर्मदेवीची विनवणी। धर्मदेवीसी सवे घेऊनी। राजसदनालागी आल्या।।२५।। धरणीदेवी समोर येऊन। करीतसे धर्मदेवीसी वंदन। मजवरी तू कृपा करोन। आलीस येथे माझियासाठी।।२६।। सांग मज तू कोठील कोण। आलीस कोणते देशीहून। धर्मदेवी म्हणे नारायणाश्रमातून। आताची येथे आले जाण।।२७।। साक्षात वैकुण्ठनारायण। असे गे माझा भ्रतार। कार्यानिमित्त आले येथवर। नाम माझे धर्मदेवी।।२८।। धर्मदेवीस सांगे धरणीदेवी। माझी कन्या पद्मावती। बहु व्याधिग्रस्त असे जाहली। सांग माते उपाय मजसी।।२९।। मग उत्तमासन देवून। बैसवी राणी धर्मदेवी लागून। धर्मदेवी होऊन हास्यवदन। बोलतेस धरणीदेवीसी।।३०।। सांगे तिजसी ऐक वचन। तू करी वेगीं मंगलस्नान।

शुभ्रकंचुकी शुभ्रवस्त्र नेसोन। गुरुदेवतेसी नमस्कार करी।।३१।। धरणीदेवी तैसेची करोन। पश्चिमाभिमुखी बैसली येवोन। म्हणे माते बोल वचन। काय करु या नंतरी।।३२।। तिजसी बोले पुलंदिनी। माते देई वायन त्वरे करोनी। सुवर्णशूर्पी मौक्तिक भरुनी। तंडुलयुक्त वायन देई।।३३।। भक्तिपूर्वक ऐसे वायन। देतसे धरणी त्वरे करुन। पुलंदिनी म्हणे तिज। बालकास्तव देई उत्तमान्न।।३४।। मग सुवर्ण पात्री क्षीरान्न। तात्काळ आणिले निर्मून। परी बालक न भक्षी जाण। मानुषी अन्न म्हणोनिया।।३५।। बालकासी करुन ताडन। खाऊन राहणार कंदमूळ। राजनिर्मित अन्न निर्मळ। कैसे भक्षील हा दुदैवी।।३६।। मग पुलंदिनी करी भोजन। बैसली स्वस्थ करुनी मन। मग पूर्वाभिमुख बैसोन। घेई बालका निजांकावरी।।३७।। आता एकाग्र मन करोनी। सर्व देवांसी स्मरे पुलंदिनी। आदिनारायणासी चिंतुनी। ध्यातसे ती लक्ष्मीदेवी ते।।३८।। हरिहरेश्वरासह सर्व देव। तैसेची गंगादि नद्या सर्व। अंबिकादि देवता सकल। स्मरोनी निर्भर झाली ती।।३९।। झाली सकल दैवते चिंतून। म्हणे मी सत्यवचन बोलेन। मुख शुध्दीसाठी त्वरे करुन। तांबुल मज दे जननी।।४०।। तांबुल तो त्रयोदश गुणी। राज पत्नीने दिला आणुनी। तो तांबुल भक्षण करुनी। बोलती झाली पुलंदिनी।।४१।। म्हणे धरणीदेवी ऐक आता। तुझिया कन्येची कथा। सखियांसह तव दुहिता।

उपवनासी गेली होती।।४२।। तेथे आनंदे खेळत असता। एक पुरुष आला अवचिता। अश्वारुढ त्याचे रुप पाहता। कोटीकाम वोंवाळीजे।।४३।। आकर्ण विराजती कमलनयन। मुकुट कुंडले शोभायमान। गळा वैजयंतीमाळा सुंदर। तेज जेवी चंद्र दिवाकर।।४४।। पाहुनी ऐसे पुरुषास। तन्मय जाहले मानस। विसरली ही देहभान। अंगी विरहाग्नि दाटला।।४५।। सांगे सख्यांसी पूसा वर्तमान। सखिया पूसती तया लागून। परी काय करी तो पुरुष। पद्मावती जवळी आला।।४६।। आपुला वृत्तांत वेगेसी। सांगितला तेणे पद्मावतीसी। हीने आपुला वृत्तांत त्यासी। कथिला सर्वही हे जननी।।४७।। तो पुरुषही जाहला विरहग्रस्त। इयेसी बोलिला मदनयुक्त। ऐकून ही झाली क्रोधयुक्त। सखियांसह तेथून निघाली।।४८।। मग तो पुरुष करी पाठलाग। सख्या वर्षती त्यावर पाषाण। अश्व भंगला पाषाण घाते करुन। खिन्न होऊन गेला उत्तरेसी।।४९।। पद्मावती मनी करी विचार। ऐसा सुंदर नसे कोणी भूवर। दाटला मनात पंचशर। विरह व्याकुळ ती जाहली।।५०।। भूतबाधा नाही तियेस। ग्रहबाधा ही नसे तियेस। विरहदु:खे व्यापिले मानस। सत्य असे हे त्रिवार।।५१।। तो षुरुष वैकुण्ठपती रमारमण। श्री व्यंकटेश असे नामाभिधान। आता विचारी तू कन्ये लागून। सत्य वर्तमान काय ते।।५२।। मग माता विचारी कन्येसी। काय वर्तमान तू सांग मजसी। माझी आण असे तुजसी। काय मनी सांग

मज।।५३।। म्हणे कन्या ऐक जननी। क्रीडाकरण्या गेले होते उपवनी। पाहीला अश्वारुढ पुरुष मी । होते अलौकिक रुप त्याचे।।५४।। पाहुन तयाचे सुंदर वदन। झाले घायाळ माझे मन। जरी मज होईल तो भ्रतार। तरीच धन्य होईन मी।।५५।। ऐकोन ऐसा वृत्तांत। धरणीदेवी म्हणे पुलंदिनीस। देवी तुझे वचन असे सत्य। सांग काय करु यत्न।।५६।। धर्मदेवी म्हणे व्यंकटेशा लागून। करी तव कन्या अर्पण। आली कामिनी व्यंकटेशा कडून। भेटेल येवोनी ती तुज।।५७।। कन्या तयासी देते म्हणून। करी संकल्प वेगे करुन। आताची होईल सावधान। धरणीदेवी तव कन्या।।५८।। अनमान करशील जरी। जाण कन्या न वाचे तरी। ऐकोनी धरणी दचके मनी। म्हणे अशुभ बोलू नको।।५९।। मग रायासी वर्तमान। धरणीदेवी सांगे संपूर्ण। आकाशराजा बंधु सहित। कन्येपाशी तो आला।।६०।। राजा मग बोले वचन। व्यंकटेश हा कोणाचा कोण। कोणते गोत्र कोणते ग्राम। कन्या कैसी अर्पावी त्यास।।६१।। दुजे त्याज कडोनी कोणी। येथे आले नाहीत पाही। तव तयासी वदे धरणी। एक कामिनी असे आली।।६२।। धर्मदेवीने सांगितले मज। आले तिचे बोल प्रत्ययास। धर्मदेवी हे ऐकून मग। स्वस्थानासी निघून गेली।।६३।। तोवरी झाली सायंकाळ। शिवाभिषेक करोनी विप्र। प्रसाद देण्यास आले तेथ। प्रसाद रायाने घेतला।।६४।। तों पद्मावतीच्या सर्व सख्या। पहावयासी तेथे

आल्या। त्यांच्यासमवेत बकुला। राजमंदिरी ती आली।।६५।। मग पद्मावती समीप। बैसल्या तिच्या सख्या तेथ। धरणीदेवी बकुलेस पुसत। बाई आपण कोण असा।।६६।। ती म्हणे मी आहे कन्यार्थी। असे मी व्यंकटेशाची दासी। वेंकटाद्रिवरुनी तव स्थानासी। तुझे दर्शना आले मी।।६७।। धरणी मग विचारी बकुलेस। हा व्यंकटेश कोणाचा कोण। सांग सकल वर्तमान। माता - पिता त्याचे कोण।।६८।। बकुला मग तियेसी सांगत। असे तयाचा सोमवंश। जननी देवकी वसुदेव जनक। श्रीकृष्ण असे नाम त्याचे।।६९।। गोत्र तयाचे असे वसिष्ठ। श्रवण असे त्याचे नक्षत्र। विद्यावंत आणि द्रव्यवान। अलौकिक असे हा व्यंकटेश।।७०।। धरणीदेवी तिज म्हणत। जर असे हा विद्यावंत। जरी रुपवान असेल तर। विवाह तयाचा का राहीला।।७१।। बकुला म्हणे धरणीसी। लग्न झाले आहे याचे आधी। परी संततीस्तव केवल। दुसरा विवाह करीतसे।।७२।। ऐकोनी बकुलेचे वचन। गुंतले धरणीदेवीचे मन। मग रायाप्रती जावोन। सकल वृत्तांत ती सांगे।।७३।। विद्यावान आणि सुंदर। पराक्रमी आणि धनवान। व्यंकटेशासारखा दुजा वर। पृथ्वीवर कोणी नसेची।।७४।। कन्येच्या मनी असे निर्धार। व्यंकटेशच हवा तिज वर। त्याचे विरव्यथेने साचार। व्याधिग्रस्त ती झाली।।७५।। आकाश झाला आनंदित। बोलवी तोंडमान अन् वसुदानास। तयासवे तो विचार करीत। कुलगुरुस मग बोलवी

तो।।७६।। आले कुलगुरु अंगिरासुत। राजा तयासी नमन करीत। षोडशोपचारे पूजुनी तयास। सांगे वृत्तांत साद्यंत।।७७।। बोले यावरी अंगिरासुत। वैकुण्ठपती असे व्यंकटेश। माया नियंता तो परमेश्वर। असे अज, अजित, निर्विकार।।७८।। तुझ्या कन्येसाठी पूर्ण। आला कैसा तो वैकुण्ठाहून। नवल वाटते मज लागून। घे बोलावून शुकाचार्यास।।७९।। राजाज्ञा घेऊन तोंडमान। तात्काळ निघाला रथ घेऊन। शुकाश्रमा समीप येऊन। लोटांगण तो घलितसे।।८०।। तोंडमान आलेला पाहून। धावून आला योगिराज। पुसे तया येण्याचे कारण। सांगे राजाने तुम्हा पाचारिले।।८१।। पद्मावती नाम कन्येसी। देऊं पाहती व्यंकटेशासी। त्याची वार्ता काय कैसी। पुसावयासी तुम्हा बोलाविले।।८२।। ऐकोनी ऐसे वर्तमान। झाला हर्षित व्यासनंदन। नाचे तो हर्षभरित होऊन। हर्ष न माये गगनांतरी।।८३।। मग रथी बैसोन सत्वर। पावले वेगी नारायणपुर। शुक योगींद्रास पाहूनी। आला राया धावोनी।।८४।। घातली रायाने चरणमिठी। बैसविले शुकास सिंहसनी। अर्ध्य पाद्यादि उपचार करुनी। षोडशोपचारे केली पूजा।।८५।। राया म्हणे कन्या पद्मावती। देऊ इच्छितो व्यंकटेशासी। परी त्याची स्थिती असे कैसी। नसे ठावे ते आम्हासी।।८६।। यावरी शुक बोले हासोन। म्हणे राया तू भाग्यवान। म्हणुनी व्यंकटेशा समान। जामात तुज लाभतसे।।८७।। ऐसे बोलिता शुकयोगींद्र। आनंदला मनी नृपवर।

म्हणे नाडी, कूट समग्र। मिळे कैसे पहावे आपण।।८८।। व्यंकटेशाचे श्रवण नक्षत्र। पद्मावतीचे असे मृग नक्षत्र। मिळोनी आले छत्तीस गुण। राजा आनंदला मानसी।।८९।। सर्व सभेमाजी सर्वां समक्ष। करीतसे राजा दृढ संकल्प। म्हणे वैकुण्ठाधिपती श्रीनिवास। त्यासी मी कन्या दिधली।।९०।। बोलता ऐसे नृपवर। जाहला एकची जयजयकार। वाद्ये वाजती अपार। सुरवर सुमनें वर्षती।।९१।। त्यानंतर तो आकाशराज। बोलतसे शुकाचार्यांस। नाही कळविले व्यंकटेशास। तो मान्य करील की।।९२।। बोलती तयासी शुकमुनी। नको करु चिंता मनी। देई एक पत्र लिहूनी। भेटतो जाऊन मी त्यासी।।९३।। ऐकोनी तोषला आकाशराज। लिहीतसे पत्र व्यंकटेशास। चिरंजीव विजयी जगन्मोहना। श्री व्यंकटेशा रमारमणा।।९४।। येथून नारायणपुराहून। करी आकाशराय आशीर्वचन। आजवरी क्षेमकल्याण। तुझ्या कृपे असो आम्ही।।९५।। तू अज, अव्यय, देवाधिदेव। ऐक मम मनीचा भाव। माझी कन्या पद्मसंभव। तुजलागी मी अर्पिली।।९६।। सच्चिदानंदा नारायणा। मान्य करावी मम प्रार्थना। आंगिकारावे मम कन्यारत्ना। करावे मनोरथ पूर्ण माझे।।९७।। वैशाख शुद्ध दशमीसी। भृगुवारी निश्चिले लग्नासी। सहपरिवारे त्या संधीसी। लग्नाकारणे येई जे की।।९८।। पत्रासी एवढेच कारण। सांगतील शुकयोगींद्र वर्तमान। तू जगन्निवास नारायण। पत्रोत्तर तया हाती देईजे।।९९।। पत्र घेऊनी

वेगेसी। शुक आला वेंकटाद्रिसी। मग पुसोनी धरणीदेवीसी। निघाली बकुला त्वरेने।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय सातवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन श्रीस्वामी समर्था। असे अपार तुमची कृपा। वर्णण्या अशक्य शब्दा। शब्दातीत वात्सल्य तुझे।।१।। श्री व्यंकटेशाचा थोर महिमा। धरणीधर ही वूर्ण शकेना। कैसा वर्णन तो करावा। पामराने शब्दामाजी।।२।। असे लेकरु मी समर्थाचे। समर्थांच्याच कृपा हस्ते। वर्णिन माहात्म्य व्यंकटेशाचे। असे विश्वास गणेशामनी।।३।। जय जय श्री पद्मनाभा। पयोब्धिवासा दीनदयाळा। असे अगम्य तुझी लीला। वदवी तू ची माझ्या मुखे।।४।। आकाशराजाचे घेऊन पत्र। पातला वेंकटगिरी व्यासपुत्र। असे हे कथानक बहुसुरम्य। ऐकता श्रोतृ आनंदिती।।५।। शतानंद सांगे पुढती। ऐका आता एकचित्ती। व्यंकटेशाची असे महती। करी पावन सर्वांसी।।६।। शुकमुनी गेले व्यंकटाद्रिसी। पाही श्रीनिवास तयांसी। दीनदयाळ तो येऊन सामोरी। ऋषिचरण तो वंदीतसे ।।७।। मग आलिंगतसे हरी शुकासी। बैसविले उच्चासनी तयांसी। वर्तमान सारे विचारी ऋषिसी। बहुआदरे करुनिया।।८।। मग आकाशरायाचे पत्र। शुकमुनी

श्रीहरी हाती देत। ते पत्र उकलोनी रमानाथ। वाचू लागला ते काळी।।९।। शुक सांगती श्री हरीसी। उत्तर लिहून द्यावे पत्रासी। हो म्हणून वेंकटाद्रिवासी। उत्तर लिहून देतसे।।१०।। त्याच पत्रा खाली सत्वर। हरी लिहीतसे उत्तर। परिसावे श्रोते हो आतुर। पत्रोत्तर ते काय असे।।११।। जितुके तीर्थे पृथ्वीवरती। तत्स्वरुप तू आकाश भूपती। नारायणपुरीचा नृपती। नमन माझे तुजसी असे।।१२।। वेंकटाद्रिवरुनी श्रीनिवास। करीतसे विज्ञापना विशेष। आपण व्यासपुत्र शुकाचार्यास। पत्र देवोनी पाठविलेती।।१३।। ते पत्र घेऊनी लवलाही। आला शुकपुत्र शुभ समयी। पत्रार्थ पाहुनी सर्व ही। परमानंद झाला आम्हासी।।१४।। पद्मसंभव कन्या आपुली। आम्हासी आपण अर्पिली। वैशाख शुध्द दशमी भृगुवारी। लग्न निश्चित केले असे।।१५।। तुमची आज्ञा आम्हा प्रमाण। केले आम्ही वचन मान्य। पद्मसंभव तुमचे कन्यारत्न। अंगिकारीले असे आम्ही।।१६।। वैशाखमासी निघोन। येतो आम्हीं लग्नाकारण। ऐसे पत्रोत्तर लिहोन। शुकाहस्ती पाठविले।।१७।। आज्ञाघेवोनी ऐसे परी। शुक आला नारायणपुरी। सांगे वर्तमान नृपासी। परम संतोष जाहला।।१८।। इकडे बकुला निघोन तेथून। आली वेंकटगिरीस त्वरेने। भेटे आनंदे व्यंकटेशा लागून। सांगितसे सर्व वर्तमान।।१९।। श्रीहरि म्हणे मग तिजसी। माते तू धन्य असशी। साधिले माझे कार्यार्थासी। न विसरेन तव उपकार।।२०।। ऐसेच

काही दिवसानंतरी। बकुला म्हणे वैकुण्ठविहारी। अरे लग्नाचे दिवस यावरी। आले जवळ जगदीशा।।२१।।अद्याप पर्यंत लग्नसाहित्य। काहींच केले नाही सत्य। वराडी तुजकडे यथार्थ। कोणीच दिसत नाही हरी।।२२।। बकुलेचे बोल ऐकून। तिजसी म्हणे नारायण। नसे चिंतेचे कारण। स्वस्थ राही तू माते।।२३।। हरी करी गरुडाचे स्मरण। घेतले शेषासी बोलावून। आले तात्काळ दोघेजण। श्रीहरीचरण ते वंदिती।।२४।। वंदुनी श्रीहरि चरणासी। पुसती ते व्यंकटेशासी। सांगावे आपुले आज्ञेसी। करु पूर्ण ती सर्वथा।।२५।। श्रीहरि सांगे गरुडासी। तू जावे सत्यलोकासी। माझी आज्ञा विधीसी। सांगावी तू जाऊन।।२६।। देतो मी पत्र लिहून। सत्वर जाई पत्र घेऊन। सांगावे तयासी जाऊन। लग्नासी येणे करावे।।२७।। आणा चतुर्दश लोकीचे सर्वजण। स्त्रिया पुत्रासह सर्वजण। आपुली सकल सेना घेऊन। परम गजरे यावे नक्की।।२८।। वैशाख शुध्द दशमीसी। तिथी निश्चित लग्नासी। याकारणे गरुडा तू वेगेसी। जावे आत्ताची त्वरेने।।२९।। मग स्वहस्ते लिहून पत्र। गरुडा हस्ती दिले सत्वर। आज्ञा वंदोनी खगेश्वर। सत्य लोकाप्रती निघाला।।३०।। मग श्रीपती बोले शेषास। जावे बा तू कैलासास। बोलाविजे नीळकंठ शिवास। लग्नासी अवश्य येईजे।।३१।। आकाशरायाची दुहिता। पद्मावती नामें कन्या। अर्पिली मजलागी देखा। आकाशराजे परम प्रितीने।।३२।। वैशाखशुध्द

दशमी भृगुवार। लग्न नेमिले निश्चित। शेषा तू जावोनी सत्वर। शंकरासी निमंत्रण देईजे।।३३।। स्कंद आणि गजानन। अष्टसिध्दी अष्ट भैवरगण। साठी कोटी शिवगण। लग्नाकारणे अवश्य यावे।।३४।। नवकोटी कात्यायनी। चौसष्ट कोटी महायोगिनी। यांचेसह गजास्यजननी। लग्नाकारणें आणावी।।३५।। चरण वंदुनी भोगिनाथ। कैलासाप्रति निघे त्वरीत। इकडे सत्यलोका प्रती विष्णुरथ। जाता जाहला ते काळी।।३६।। सभा भरली घनदाट अपूर्व। सिंहासनी बैसला कमलोद्भव। सन्मुख उभे सर्व देव। विनम्र वृत्तीने विधि समोर।।३७।। मरुद्गण पितृगण। एकादश रुद्र द्वादशादित्य। अष्टवसु दिक्पाळ पूर्ण। कर जोडोनी उभे असती।।३८।। चारही वेद उभे समोर। सिंहासनी होता कलोद्भव। सरस्वती अन् सावित्री कलत्र। करती पादसेवन तयाचे।।३९।। सभेत आला विष्णुरथ। दिले त्याने ब्रह्मयासी पत्र। म्हणे आज्ञापितसे श्रीधर। सत्वर लग्नास्तव यावे जी।।४०।। गरुडासी ब्रह्मदेव पुसत। असे कोणाचे हे लग्न। नवरी कोण नवरा कोण। असे कोठे जगन्नाथ।।४१।। नसे भेटला बहुत दिवस। भक्तोध्दारक रमारमण। काय तयाचे असे वर्तमान। झटिती सांगावे आम्हासी।।४२।। बोले तेंव्हा विनितासुत। होते वैकुण्ठी जगन्नाथ। भृगुऋषींनी मारिली लाथ। श्री निवासासी तये वेळी।।४३।। हे पाहूनी कोपली इंदिरा। निघून आली करवीरपुरा। तिचा वियोग न

साहे श्रीधरा। महीवरती केले आगमन।।४४।। श्री वेंकटाद्रिपर्वतावरी। राहता झाला मुरारी। आकाशरायाची कुमारी। पद्मावती नामे कन्या असे।।४५।। दिधली तयाने ती श्रीहरीसी। लग्न निश्चिले वैशाखमासी। याकारणेच स्वयं कमलापती। तुम्हा लग्नासी बोलवितसे।।४६।। आनंदला मग कमलासन। पाही लग्नपत्रिका उकलोन। सुवर्णाक्षरे सुंदर मनोहर। पत्र विधीने पूर्ण वाचीले।।४७।। पत्र वाचीत असता कमलासन। ऐकती सर्व होवोन सावधान। चिरंजीव चतुरानना सत्यलोकेश। श्री निवासाचा तुज आशिर्वाद।।४८।। आकाशराज सोमवंशी भूपती। कन्या असे त्याची पद्मावती। दिधली तयाने ती मजसी। वैशाखशुध्द दशमी लग्नतिथी।।४९।। तरी आपण सहकुटुंब परिवार। तेहतीस कोटी देव सकल। स्त्रिया वस्त्रालंकारासह। लग्नासी अवश्य यावे जी।।५०।। आज्ञा देई कमलासन। दुंदुभी वाद्यझंकार करोन। श्रुत करावें सर्वां लागोन। वेंकटाद्रिसी जाण्या स्तव।।५१।। ऐसे सत्यलोकींचे सर्वजण। निघाले हंसारुढ होवोन। सावित्री इत्यादि स्त्रिया सकळ। निघाल्या जाण्या व्यंकटाद्रिसी।।५२।। शचिस घेवोन पुरंदर। ऐरावतारुढ निघाला सत्वर। दुंदुभी निनादती एकस्वर। परमानंदोत्सव करती ते।।५३।। मित्र लोक अन् चंद्रलोक। निघाले सर्व तेथींचे लोक। सत्यलोकतः स्वर्लोकापर्यंत। स्त्रिया पुरुष निघाले सर्व।।५४।। तेणे अवचित नभमंडळी। दाटी विमानांची झाली। रथ, अश्व, कुंजर

याने सकळी। उतरताती भूमीवरी।।५५।। गजर वाद्यांचा ऐकोन। पाहे बकुला बाहेर येवोन। तो वाद्यगजरे सारे गगन। निनादोनी गेले असे।।५६।। बकुलामनी दाटले आश्चर्य। पुसतसे ती रमावर। असंख्य वाद्यांचा गजर। आश्चर्यची वाटे मम मनी।।५७।। मग परमात्मा म्हणे तिजसी। माते हे सर्व वराडी लग्नासी। आले आहेत सकुटुंबेसी। चिंता आता करु नको।।५८।। रथ, अश्व, वाहन समस्त। अकस्मात उतरले तेथ। तेहतीस कोटी सुरगण सर्व। वेंकटाद्रिवरी पातले।।५९।। मुख्य तयांत दोघेजण। कमलोद्‍भव अन् शचीरमण। श्रीहरीचे दर्शना कारण। पुढे निघाले ते वेळी।।६०।। मागुनी निघाले देवगण। मंदिरी होते रमारमण। कमलासन अन् शचिरमण। साष्टांग नमन करती त्यासी।।६१।। मग नंतर अनुक्रमे करोन। सर्व देवे वंदिले हरिचरण। सावित्र्यादि स्त्रिया सर्वजणी। श्रीहरिचरण वंदिले त्यांनी।।६२।। ऐसे वऱ्हाडी व्यंकटगिरी। पातले सह कुटुंब मंडळी। इकडे भोगिराज जाई कैलासी। पत्र देण्या श्रीहरासी।।६३।। शुभ्रवर्ण कैलासभुवन। उंच तेजस्वी विराजमान। शुभ्रमंडप विशाळगहन। सिंहासन शुभ्र शोभतसे।।६४।। पूर्ण तेजस्वी कर्पूरगौर। मृडानी सहित जगदुध्दार। पुढे विराजे नंदिकेश्वर। गणेश, स्कंद, वीरभद्र ही तेथे।।६५।। येथे रजतमांची नसे वार्ता। वैराग्यशील सारी जनता। अधिपती भुवनींचे चौदा। राहती येथ भृत्य होऊनी।।६६।। उदार सुहास्य वदन सुंदर।

विराजमान नीळकण्ठधर। ललाटी शोभे किशोर चंद्र। मस्तकी नीर वाहतसे।।६७।। देवोनी तयाचे करी पत्र। भुजंगम वंदितसे चरण। विनित होऊनी सप्रेम। बोलता झाला ते वेळी।।६८।। श्रीनारायणे दिधले पत्र। कृपया पहावे वाचून। सहपरिवारें लग्नाकारण। श्री वेंकटाद्रिसी चलावे।।६९।। वचन ऐकोनी शिव आनंदे। पत्र ते उकलोनी पाहे। पत्रात लिहीले नारायणें। श्रोतेजन परिसा हो।।७०।। श्रीमत्कैलासाचळ विहारा। भक्त कैवारी त्रिपुरहरा। श्रीहरी करितसे नमन चरणा। वेंकटाद्रिहूनी श्रीशंकरा।।७१।। या पत्राचे असे मुख्यकारण। आकाशनृपती गुणसंपन्न। त्याची कन्या परम सगुण। पद्मावती असे नाम तिचे।।७२।। आकाशरायाने दिधली मजसी। लग्नतिथी वैशाख शुध्द दशमी। भृगुवारी केली असे निश्चिती। लग्ना कारणे अवश्य येईजे।।७३।। कुमार अन् करिराजवक्र। साठी कोटी गण समग्र। आपापले शस्त्रवस्त्र। सहीत सर्वांनी येणे करावे।।७४।। सखियांसहीत त्रिजगज्जननी। संगे आणावी हेरंब जननी। ऐसे सर्वसकल निघोनी। वेंकटगिरीवरी यावे।।७५।। ऐसे पत्र पाहिल्यावरी। जाहला आनंदमय त्रिपुरारी। सर्वांस मग आज्ञा करी। झटिती निघावे अविलंबे।।७६।। सर्वांआधी विनायक। निघता झाला विघ्ननाशक। सिध्द करोनिया स्वमूषक। तयावरी बैसोनी चालला।।७७।। मयूरारुढ षण्मातूर। निघाला तो ही त्वरे करुन। नंदीवाहन कर्पूरगौर। सिध्द होवोनी चालले।।७८।।

आदिमाता हिमनगनंदिनी। तात्काळ निघाली सिंहवाहनी। निघाल्या सर्व कात्यायनी। चामुंडा योगिनीं समवेत।।७९।। वाद्यांचा बहु गजर करीत। पातले सर्व वेंकटगिरीस। भेटण्यासाठी श्री व्यंकटेशास। येता जाहला सदाशिव।।८०।। गेला समोर जगज्जीवन। वंदिले त्याने सदाशिव चरण। देत दोघे एकमेका आलींगण। त्या शुभवेळी शुभसमया।।८१।। देवांसमवेत कमलोद्‌भवाने। शिवचरण तेणे वंदिले। मग सर्व मिळोनी एकस्थाने। सभा करोनी बैसले।।८२।। जिकडे होता स्त्रियांचा मेळा। गेली तिकडे हिमनगबाला। सावित्री आदि स्त्रिया सकला। एकीकडे राहील्या।।८३।। यानंतर श्रीनारायणाने। विश्वकर्म्यासी बोलाविले। दिली आज्ञा इंदिरारमणे। विश्वकर्म्यासी तेधवा।।८४।। म्हणे तू नारायणपुरा जावोनी। रचावे मंडप बहु शोभिवंत। स्त्रियांसी रहावयास तेथ। प्रत्येक स्थळ निर्मावे।।८५।। बैसावयासी सभास्थान। करावे सुंदर प्रभाघन। निर्मळजळ पुष्करिणी जाण। जागी प्रत्येकी निर्माव्या।।८६।। अवश्य म्हणे तो श्रीनिवासासी। निघाला तो नारायणपुरासी। कार्य केले सुरु त्वरेसी। मंडप उभारणी आरंभिली।।८७।। मेळवून मर्गज पाषाण। त्यांनी पाया केला भरुन। काश्मिराचे मंडपांगण। साधिता झाला ते स्थळी।।८८।। स्फटिक शिळेची पोवळी। आठही दिशा साधली तळीं। त्याचे अष्टकोनी महाबळी। अष्टदिक्पाळ स्थापन केले।।८९।। काश्मिराच्या रचिल्या भिंती। हिरीयांचे खांब

लखलखती। सुवर्णाची तुळवाटे निश्चिती। लंबायमान पसरली।।९०।। मंडप सर्वदा सदा प्रभाघन। नाही चंद्रसूर्याचे कारण। रत्नमय प्रकाश गहन। अंतरबाह्य लखलखतसें।।९१।। हिरीयांचे केले सोपान। पुष्परागा चौकटी विराजमान। पद्मरागाचें तोळंबें पूर्ण। मनोहर रम्य दिसती तें।।९२।। शतखाणी मंडप विचित्र। मुक्ताफळांचे सोडले जालंदर। नीळरत्नांचे केले मयूर। प्राण नसताही ते धावती।।९३।। गरुड पाचूंपासूनी कीर। करिती शब्द नवलभोर। भिंतीवर रेखाटीले चित्र। छप्पन्न देशींचे सर्वही।।९४।। शाण्णव कुळींचे राजे परिकर। ज्याची जैसी आकृती साचार। तैसेची रेखिले भिंतीवर। आश्चर्य तयाचे वाटतसे।।९५।। ठायी ठायी पुष्करिणी सुंदर। त्यांत सोडीले सुवासनीर। वर्णिता तेथीचा विस्तार। सहस्र वर्षे न पुरती।।९६।। तीन सहस्र योजन। मंडप केले विस्तीर्ण। पृथ्वीवरील सौदर्यं पूर्ण। एकवटले तया स्थानीं।।९७।। रचोनी ऐसे दिव्य मंदिर। वेंकटाद्रिसी आले सत्वर। विश्वकर्म्याने जगदुध्दार। साष्टांग नमिला प्रीतीने।।९८।। हरी तव आज्ञाप्रमाण। निर्मिले मंडप शोभायमान। ऐकोनी संतोषला इंदिरारमण। गौरविले तेणे विश्वकर्म्यासी।।९९।। व्यंकटेशाची ही कथा सुंदर। स्वामी स्वतःच वर्णिणार। भक्त तयांचे चरणी शरण। द्यावे आशीर्वचन गणेशासी।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय आठवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

आता समर्था स्वामिराया। व्यंकटेशाची अगाध लीला। बहुत वऱ्हाडी त्याचे लग्ना। लगबगीने आले की।।१।। निर्मिला असे मंडप विस्तार। रत्नांचा उभारला धरणीवर। विश्वकर्मा रचितसे बहुसुंदर। मंडप पुष्करणीं सहीत।।२।। कैसे वर्णन करावे सर्वांचे। शब्द सामर्थ्य सारे तुमचे। अर्थाने लहडावी शब्दपुष्पे। रसभरीत कथा ही लग्नाची।।३।। वेंकटगिरी पावले सर्व देवगण। नंतर हरीस म्हणे कमलासन। करोनी आता मंगलस्नान। पुण्याहवाचन करावे।।४।। आता येथे आलेती सर्वदेव। असती ऋषी अठ्ठयाऐंशी सहस्र। करावे सर्वांचे योग्य मानपान। परी हे जाणशी तूच श्रीधरा।।५।। परी रमानाथ झाला सद्गदीत। अश्रुधारा त्याचे नेत्री वाहत। स्फुंद स्फुंदोनी वैकुण्ठनायक। रडू लागला तये वेळी।।६।। कमलोद्भव पूसे कारण। बोले तयासी इंदिरा रमण। रमा आली नसे येथ। न गमें तिजवीण काही।।७।। आठवोनी तिचे गुण। करी शोक जगन्नाथ। पाहून यावरी सदाशिव।

बोलता झाला तयासी।।८।। म्हणे जगदात्मा वैकुण्ठनाथा। का शोक करिसी वाया। तिजवरी जरी तुझी माया। लग्न कासया आरंभिले।।९।। लक्ष्मी गेली त्यागोन। म्हणोनी करीसी हे लग्न। न साहे स्त्री दुजे लग्न। मत्सर उपजे तिये अंतरी।।१०।। श्रीनिवास म्हणे धूर्जटीसी। न कळे ही गोष्टी तुम्हासी। जरी न आली येथ लक्ष्मी। कार्य सर्वथा न होईल।।११।। मग बोलावूनी सूर्यासी। श्रीधर सांगतसे त्यासी। जावे तूच करवीरासी। क्षीराब्धिकन्या असे तेथे।।१२।। बोलावून आण तियेसी। नसे समाधान चित्तासी। गेली रुसोनी मजवर ती। तै पासून मानस असे उदास।।१३।। भास्कर वदे जगन्नाथासी। आधीच रुसोनी गेली असे ती। आरंभिले आपण दुसरे लग्नासी। कैसे समजवावे तिजसी।।१४।। श्रीहरि तयासी सांगे युक्ती। तू जाऊनी करवीरपुरासी। तिष्ठावे तिचे महाद्वारापुढती। सुरु करावे तू रोदन अती।।१५।। धावून येईल अंबा बाहेरी। पूसेल कासया तू रोदन करी। तू काही अनमान न करी। सांगावे ऐसे तू तिजसी।।१६।। तुझ्या विरहे श्रीकृष्ण मुरारी। झाला व्याधिग्रस्त भारी। वाचेल की न तो तरी। चिंता आम्हासी वाटतसे।।१७।। ऐकोन तुझे ऐसे वचन। लक्ष्मी येथे येईल धावोन। पुढे तिज समजावयाचे काम। करु आम्ही नको चिंता।।१८।। व्यंकटेशाची आज्ञा घेवोनी। आला करवीरपुरी दिनमळी। महाद्वारा पुढे उभा राहोनी। करीतसे तो दीर्घ रुदन।।१९।। भास्कराचे रुदन

ऐकोन। जगन्माता धावली घाबरोन। पुसतसे तयासी कारण। स्फुंदतची तो सांगतसे।।२०।। म्हणे माते तुझ्या विरहे करुन। सोडले श्रीधरे वैकुण्ठभुवन। धरणीवरी आला निघोन। सेवितसे तो कानन।।२१।। वेंकटाद्रिवरी असे जगन्नाथ। जाहला विरहे बहु कृश। न सेवे तो अन्न आणि नीर। भरवसा त्याचा नसे आता।।२२।। भास्कर वचन ऐसे ऐकोन। लक्ष्मी गेली घाबरोन। मग सत्वर रथारुढ होवोन। वेंकटाद्रिप्रती ती निघाली।।२३।। आली ती वेंकटाद्रिसमीप। भेटले तिजसी देव समस्त। जगन्माता आली देखोन। सावित्रीसह सर्व तिज वंदिती।।२४।। येता पाहुनी इंदिरेसी। तात्काळ उभा राहीला श्रीपती। मग आपल्या भुजा पसरोनी। आनंदे तिज आलिंगते।।२५।। प्रेमे आलिंगिता तिजसी। हर्षित जाहला हृषिकेशी। साद्यंत वर्णितसे कथेसी। ऐकोनी लक्ष्मी हसो लागली।।२६।। मग श्रीधरासी ती बोलत। कासया धाडिले भास्करास। आणविले बोलावून आम्हास। कारण निमित्त न कळतसे।।२७।। आरंभिलेती विवाहासी। येईल नुतन स्त्री तुम्हासी। न कळे माया आम्हासी। विनोदे लक्ष्मी बोलतसे।।२८।। तिज श्रीधर म्हणे मी निर्विकार। तव इच्छा मात्रे झालो साकार। आता जो विवाह होणार। हे ही इच्छा तुझीच इंदिरे।।२९।। आठव रामावतारा माजी। सांगितले तू ची आम्हासी। करावा विवाह वेदवतीसी। परी मी होतो एक पत्नीव्रत।।३०।। न केला विवाह तेंव्हासी। परी तव

वचन पूर्ण करण्यासी। आरंभिले दुज्या विवाहासी। मग कासया रुसशी तू।।३१।। ऐकोनी श्रीनिवासाच्या बोला। परम संतोषली कमला। वचन दिलेती प्राणनाथा। व्हावे सत्य या अवतारी।।३२।। ऐकोनी कमलेचे वचन। झाला हर्षित नारायण। मग करण्यास मंगलस्नान। झटिती तो निघाला।।३३।। मांडिला रत्नजडित चौरंग। वरी बैसविला भक्तभयभंग। सुवर्णवाटीत चंदनाग्यंग। सुगंधी तेलही घेतलेसे।।३४।। इंदिरा अपर्णा सावित्री। सरस्वती आणि गायत्री। तयांसमवेत अरुंधती। करती तैलाभ्यंग मज्जन।।३५।। जाहले ऐसे अभ्यंगस्नान। तडित्प्राय पीत वसन। स्वहस्ते कमला आपण। नेसवितसे श्रीहरीसी।।३६।। सर्वांगास लावली केशरउटी। कस्तुरी तीलक ललाटी। वैजयंतीमाळा कंठी। मुकुट कुंडले राजित श्रीधर।।३७।। मग कश्यपादि ऋषी मिळोन। करती स्वस्ति वाचन। म्हणती वसिष्ठ हे नारायण। करावी कुलदैवत स्थापना।।३८।। शमीवृक्ष हरीचे कुलदैवत। मग सकल शमीपाशी येत। करोनी त्याचे यथासांग पूजन। वराहसमीप मंडपदेव स्थापिती।।३९।। म्हणती जाऊ नारायणपुरासी। परी चतुरानन वदे तयांसी। स्वस्ति वाचन करोन उपवासी। जाऊ नये येथोन।।४०।। करावा येथेची भोजनविधी। हरी अंतरी विचार करी। पूसती विधी, ईशान, वैश्रवण। चिंता कोणती तुजसी।।४१।। मग हरी म्हणे तयांसी। द्रव्य अनुकूल नसे आम्हासी। द्रव्यावाचोनी या युगी। भोजन कैसे होईल

सिध्द।।४२।। द्रव्याविणे न होईल स्वार्थ। न घडेल द्रव्याविण परमार्थ। या कलीयुगामाजी द्रव्यावीण। न साधे कार्य कदापि।।४३।। परी आता कमलासना। काय करावे आम्ही आता। विधी म्हणे हे श्रीधरा। कुबेरापासून धन घेईजे।।४४।। शिवमित्र मग बोले तयास। युगानुसार जर करावे कार्य। तरी द्रव्यास्तव पत्र लिहोन। द्यावे सत्त्वर श्रीहरि।।४५।। मग श्रीहरी लिहीतसे पत्र। धनको वैश्रवण विशेष। ऋणको नाम श्रीनिवास। घेतसे द्रव्य तुजपासोन।।४६।। चवदा लक्ष निष्क। राजमुद्रांकित सुरेख। माझे कल्याणार्थ देख। असे घेतले निर्धारी।।४७।। आज पासोनी यथार्थ। सहस्र वर्षांपर्यंत। द्रव्य पोहोचेल समस्त। संशय मनी नसावा।।४८।। ऐसा जगदात्मा भगवान। कुबेरापाशी घेतले ऋण। कुबेर मागतो पत्र लिहुन। आश्चर्य सकल वाटतसे।।४९।। मम वर्त्मानुवर्ततें म्हणोन। गीतेत बोलीला मधुसूदन। लोकसंग्रहार्थ श्रीनारायण। लीला विचित्र दावितसे ।।५०।। द्रव्य मिळताची जनार्दन। वितिहोत्रासी तो आज्ञापित। घेऊन स्वाहा स्वधेस। करावी पाकसिध्दी सत्त्वर।।५१।। जाहले सर्वांचे भोजन। मग तेथेच केले शयन। दुसरे दिनी उगवला मित्र। निघाले सर्व सिध्द होवोन।।५२।। आले पद्मावती तीर्था समीप। वसतसे तेथ शुकयोगींद्र। त्याची विनंती स्विकारोन। भोजन श्रीहरि करीतसे।।५३।। जेविला तेथे जगज्जीवन। गुंफे बाहेर इतर सर्वजण। झाले सर्वही

क्रोधायमान। म्हणती शुकासी शापू आम्ही।।५४।। तेंव्हा श्रीहरी करी चमत्कार। फुंकरोनी सोडितसे श्वास। तेणे सर्वांची क्षुधा दूर होत। जाहले आनंदमय सर्वही।।५५।। झालो होतो आम्ही कोपीष्ट। परी जाहलो आत संतुष्ट। मग वंदिती सर्व श्रीहरिचरण। प्रेमभक्ति भावे करुनिया।।५६।। शुकाश्रमी ऐसे करोनी भोजन। प्रीतीने निघाला नारायण। वऱ्हाडी वाजंत्री वाजत गाजत। आला श्रीहरी नारायण पुरासी।।५७।। नारायणपुरीचे वर्तमान। नवमीदिनी आकाशनृप। अष्टवर्गासी आरंभीत। सकल कुटुंब मंडळीसह।।५८।। सुगंधी तेल हरिद्रा लावून। करविले नवरीस मज्जन। आकाशनृप करी मंगलस्नान। धरणीदेवी समवेत।।५९।। आकाशराये अष्टवर्ग करुन। केले मंडपदेवता स्थापन। अस्त पावतसे दिनकर। आनंदी सर्व नहाती।।६०।। चार येवोन रायास वंदिती। सांगती उठावे नृपती। आले जवळ वैकुण्ठपती। निघाला नृपती जाण्यासी।।६१।। करुनी सिध्द दळभार। निघाला सह वाद्यगजर। निजभार घेवोन नृपवर। सामोरी श्रीधरास जाण्यासी।।६२।। ब्रह्मा आणि सदाशिव। दोन्ही भागी दिसती परिकर। मध्यपिठी जगदुध्दार। मदनमोहन विराजितसे।।६३।। श्रीहरि म्हणे नारदासी। आकाशराज कोण असती। दाखवावे आपण मजसी। ब्रह्मानंदना आत्ताची।।६४।। नारदा म्हणे नृपवर। दीर्घबाहू दिसे परिकर। दीर्घ स्मश्रु अश्वरहंवर। अवघे दीर्घ दिसतसे।।६५।। जवळी येता राजेश्वर

गरुडावरुनी उतरला श्रीधर। श्वशुरासी जगदुध्दार। वंदन करी तेधवा।।६६।। सम्मुख पाहोनी घनश्याम। रायासी नावरे प्रेम। कंठीमिठी घालोन परम। दृढ आलिंगन तो देतसे।।६७।। तेथेची मांडोनीया चौरंग। त्यावरी बैसविला श्रीरंग। करी प्रेमे सीमांत पूजन। परम गौरवे नृपनाथ।।६८।। ऐसे करोनी सीमांतपूजन। मिरवत चालीले संपूर्ण जन। गरुडावरी मग आरोहण। करिता जाहला श्रीहरी।।६९।। चतुर्विध वाद्य गजरात। चालीले सर्व नारायणपुरात। नगरलोक पाहण्या धावत। परम कौतुके करुनिया।।७०।। पाहोनी हरीचे मुखवदन। नगरजन गेले भुलोन। म्हणती इतका सुंदर पुरुष। नाही देखिला यापूर्वी।।७१।। नानापरी उत्सार करीत। मंडपासी आला वैकुण्ठनाथ। मग वदे तोंडमानास। क्षुधाक्रांत असती देवऋषी।।७२।। तोंडमाने पाकसिध्दी करवून। पात्रे मांडली न लागता क्षण। हरी आज्ञेने सर्वजण। भोजनासी बैसले।।७३।। तेंव्हा देव अन् ऋषिगण। स्त्रिया आणि थोर लहान। भोजनविधी संपादोन। करती शयन रात्रिमाजी।।७४।। शुध्द दशमी शुक्रवार। उदयगिरी आला दिनकर। अभ्यंगस्नान श्रीधर। करिता झाला तेधवा।।७५।। सायंकाळचे अवसरी। वर आणविया निर्धारी। निजभार सर्व घेऊनी। आकाशराज निघाला।।७६।। आला आकाश धरणीदेवी सह। सुरवर मेळी असे वैकुण्ठनाथ। ऋषिमंडळी समस्त। सभोवती असती बैसली।।७७।। आकाशराज सांगे

कांतेप्रती। करावे पूजन श्रीपती प्रति। मांडून रत्नजडित चौरंगासी। बैसविला त्यावरी श्रीरंग।।७८।। हरिद्रा मिश्रित सुरंग तेल लावूनी। सर्व स्त्रियांसही नृपकामिनी। हस्ते हरिपूजन आनंदे करुनी। म्हणती जामात उत्तम लाभला।।७९।। करवूनी हरिसी मंगलस्नान। उत्तम वस्त्रालंकारे करोन। कंठी पुष्पमाला त्याचे घालून। जगन्मोहनास पूजिले।।८०।। धडकती दुंदुभीचे ध्वनी। वृंदारक सुमनें वर्षती गगनी। ऐसा मिरवत चक्रपाणी। मंडपद्वारासी पातला।।८१।। तोंडमानाची कामिनी। आली कुंकोदक घेवोनी। ओवाळी हरिसम्मुख येवोनी। नंतर नेत्रास नीर लावी।।८२।। मग शास्त्राप्रमाणे करुन। राव करी मधुपर्क पूजन। वस्त्राभरणे देवोन। गौरविला राये जगन्मोहन।।८३।। लग्न घटिका आली जवळी। एवं ते शृंगार सरोवर मराळी। पद्मावती आकाशबाळी। वस्त्राभरणें गौरविली।।८४।। अंत:पट धरीले त्वरीत। राया पद्मावतीस आणीत। विप्र बोलती मंगलाष्टक। म्हणती व्हावे कल्याण सर्वदा।।८५।। विप्र शुभमंगलाष्टक बोलता। तो अंत:पट फिटला तत्त्वता। देव, ॠषी, सर्वजनही अक्षता। टाकीती वधुवरांवरी।।८६।। जाहला बहु वाद्यगजर। नांदे कोंदटले पुष्कर। देव वर्षती सुमनभार। जयजयकार मोठा जाहला।।८७।। मंत्राक्षता घेऊनी जगन्नाथ। पद्मावतीचे शिरी घालीत। तोची शिरी ठेविला वरदहस्त। अक्षय कल्याणकारक जो।।८८।। देवाचार्य करविती गोत्रोच्चार। पद्मावतीचे अत्रि गोत्र।

व्यंकटेशाचे वसिष्ठ गोत्र। आणि करविले कन्यादान।।८९।। आचार्यज्ञे पद्मावतीस उचलोन। घेऊनी चालीला जगज्जीवन। बोहल्यावरी ऐसा जाऊन। लाजाहोम आरंभिला।।९०।। नंतर पद्मावतीसहीत सर्वोत्तम। करी स्त्रियायुक्त भोजन। त्या पंक्तीत मुख्य वऱ्हाडीन। बकुला, लक्ष्मी, सावित्र्यादि होत्या।।९१।। सावित्री सांगे व्यंकटेशासी। घास भरवावा पद्मावतीसी। अवश्य म्हणोन श्रीपती। परमान्न घास मुखी घालती।।९२।। पद्मावती घेवूनी हाती ग्रास। वामकरे आवरोनी हरिमस्तक। सव्यकरी तयासी देत घास। आनंदयुक्त सोहळा झाला।।९३।। मग स्त्रिया सर्वही मिळोनी। आरंभिती हळदी उटणी। लाजुन चूर होतसे पद्मावती। तिने हरिमुखास हरिद्रा लावली।।९४।। हाती हरिद्रा घेऊनी श्रीहरी। म्हणे विशेष हुशार पद्मावती। आणिले व्यक्तात अव्यक्तासी। लावी हरिद्रा पद्मावतीसी।।९५।। चार दिवस चालीले कार्य। मग पाचवे दिवशी नृपवर। म्हणे हरीसी साश्रु नयन। अर्पिली असे स्नेहवाळी तुज।।९६।। धरणीदेवी अन् वसुदान। तोंडमान अन् सर्वजण। देती साश्रु निरोप तयांस। पाहोनी सद्‌गदीत झाला हरी।।९७।। धडकत वाद्यांचे गजरात। चक्रपाणी निघे पद्मावती सहीत। यशाशास्त्र करुनी गृहप्रवेश। आले आपुले मंडपात।।९८।। मग धरणीदेवीचे इच्छेसाठी। श्रीहरी तेथेची वास करीती। निघाली सर्व वऱ्हाडी मंडळी। आपापल्या स्थानासी जाण्यास।।९९।। लग्न जाहलिया

षण्मासात। पर्वतावरी न चढावे नि:शेष। निर्मिती अगस्ति आश्रमा जवळ शिबीर। तेथे राहे हरी पद्मावतीसह।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय नववा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामींरायांची अगाध करणी। केली लिहीती मम लेखणी। व्यंकटेशाची महिमा कहाणी। वदविती हया भक्ताकरवी।।१।। व्यंकटेश हे नामची संपूर्ण। निरंतर ध्यातो पार्वतीरमण। करीता श्रीधराचे नामस्मरण। सहजी तुटे भवबंधन।।२।। गत अध्यायी केले निवेदन। अगस्ती आश्रमा सन्निध। सपद्मावती राही रमारमण। नानाविध भोग भोगितसे।।३।। असे जेथे श्रीधराचे शिबीर। ते वन असे अतिशय सुंदर। विविध लता नाना वृक्ष अपार। फळपुष्पभारे शोभिवंत।।४।। इकडे नारायणपुरीचा वृत्तांत। कथितो आपणा साद्यंत। आकाशनृप करतसे राज्य। प्रजाहित दक्ष नृप असे तो।।५।। परी एकाएकी घडले अवचित। झाला व्याधिग्रस्त आकाशभूप। वैद्य देती नानाविध रसायन। परी व्याधि वृध्दिगंत झाली।।६।। वाचा तयाची झाली मूक। चलनवलन राहीले समस्त। राजाची ऐसी अवस्था पाहून। सेवकांसी आज्ञा दिधली।।७।। जावे अगस्ति आश्रमी सत्वर। करावी श्रुतवार्ता हरीस। पद्मावतीसही

सांगा वर्तमान। सांगावे त्वरीत येणे करावे।।८।। दूत मुखीचे ऐकून वर्तमान। झाली पद्मावती मूर्च्छित। अगस्तींनी करुनी उपचार। केले सावध तियेसी।।९।। पद्मावती अन् बकुलेसह। निघाले वेगे श्रीव्यंकटेश। मनोवेगे आले त्वरीत। नारायणपुरासी ते पातले।।१०।। सेवक बोलती श्रीहरीसी। व्यथा भारी राजयासी। न स्वास्थ असे त्यासी। वाटे अंत:काळ आला समीप।।११।। समीप देखोनी रायाचे मरण। दु:खे व्याप्त झाला नारायण। रायासी निजहृदयी कवळोन। शोक करु लागला श्रीधर।।१२।। श्रोते करती बहु नवल। म्हणती हा ब्रह्मांडाचा नायक। तयासी कैसा झाला शोक। विसंगत सारे वाटतसे।।१३।। परी मायावेषधारी मुरहर। लौकिक दावी समयानुसार। जैसा नट सोंग घेवोनी परिकर। संपादणी तो दावितसे।।१४।। शोक करीतसे जगन्नाथ। रायाने नेत्र उघडीले किंचित। सावध होवोनी मात। झाला बोलता हरीप्रती।।१५।। तूच स्वयं जगन्नाथ सर्वेश्वर। तुज काय सांगावा विचार। परी मम सुत अन् सहोदर। सांभाळावे त्यासी नारायणा।।१६।। ऐसा बोलता झाला नृपती। कासाविसी तो झाला मागुती। हृदयी घट्ट कवळूनी रमापती। त्यागिला प्राण नृपतीने।।१७।। जाहला एकची हाहा:कार। हृदयी पिटीती नारी नर। नगरीची प्रजा समग्र। शोकसागरी गेली बुडून।।१८।। दु:ख जाहले अत्यद्‌भूत। धरणीदेवी पडली मूर्च्छित। सकल स्त्रिया तिज सावरत। नाही अंत तियेचे दु:खास।।१९।। होणार ते

न चुके कोणासी। ऐसे बोलोनी हृषीकेशी। शांत करीतसे सर्वांसी। शोकापासूनी तये वेळी।।२०।। मग राजदेह उचलोन नेऊन। केला अग्निमुखी समर्पण। उत्तरकार्य रायाचे संपूर्ण। करविते जाहले यथाविधी।।२१।। सोळा दिवसानंतर व्यंकटेश। पुसोनिया समस्तांस। गेला तो पद्मावती समवेत। स्वस्थानी तये वेळी।।२२।। परी काही दिवस लोटल्यावर। तोंडमान आणि राजकुमार। उद्‌भवला दोघात कलह दुर्धर। राज्यनिमित्ते करुनिया।।२३।। उभयता आले अनंतापासी। सांगती समस्त वार्ता त्यासी। भक्त तोंडमान अन् शालक वसुदान। पहावे समान दोघांसी।।२४।। परी पद्मावती सांगे श्रीहरीस। बंधु माझा असे वसुदान। आपण तयाकडे व्हावे निर्धार। ऐकोनी संकट पडे हरीसी।।२५।। मग काय करी जगज्जीवन। शंख चक्र आयुधे दोन। दिधली त्याने तोंडमानास। स्वयं सहाय्य झाला वसुदानास।।२६।। आला युध्दाचा प्रसंग। तोंडमाना सम्मुख आला श्रीधर। तोंडमान होता तयाचा भक्त। म्हणे कैसे करु युध्द तुम्हासवे।।२७।। हरी बोले तोंडमानासी। राजेंद्रा राख क्षात्रधर्मासी। युध्दास सम्मुख येता कोणीही। शस्त्रघात नसे दोष।।२८।। तोंडमान प्रार्थितसे हरीस। सोडावे प्रथम आपण शस्त्रास। ऐकोनी तोंडमानाचे वचन। श्रीहरी तयावर शस्त्र सोडी।।२९।। जाहले तयांत युध्द तुंबळ। धारातीर्थी पडले बहुत वीर। विविध शस्त्रास्त्र प्रयोग। करीत श्रीहरि तये

वेळी।।३०।। मग तोंडमानाने सोडीले शर। रथीचे मारीले सर्व अश्व। सवेची सोडोनी एक बाण। सारथी मारला श्रीहरीचा।।३१।। आणिक पंचशर सोडोन। टाकीला हरिरथ तोडोन। हरीवर सोडीला निर्वाणशर। श्रीहरिह्दयी शर बसला।।३२।। शरघाये मूर्च्छित होवोन। खाली पडला जनन्मोहन। धावले जन चहूंकडोन। एकची हाहाःकार माजला।।३३।। वसुदानाच्या सैन्यात। जाहला मोठा आकांत। पद्मावतीकर्णी पडली मात। महा आक्रोश ती करीतसे।।३४।। आले अगस्तीऋषी धावोनी। म्हणे ऐक तू राजनंदिनी। मूर्च्छित पडला असे चक्रपाणी। होईल सावध सवेची।।३५।। तू असशी क्षत्रिय राजकुमारी। असशी महावीराची अंतुरी। रणी पडिला याचा निर्धारी। शोक सर्वथा करु नये।।३६।। अगस्ती सांगे महासतीस। ऐक माझे वचनास। तोंडमान अन् वसुदानास। राज्य वाटोनी देईजे।।३७।। मग ऋषिसहित पद्मावती। आली वेगे रणाप्रती। मूर्च्छित पडीला रमापती। सावध तयासी करीतसे।।३८।। झाले सावध भगवान। म्हणे सांगा कोठे तोंडमान। तयावरी मी बाण सोडोन। घेईन मी तयाचा प्राण।।३९।। अगस्ती म्हणती रायासी। व्यर्थ कोप का करीसी। एक तव शालक दुजा भक्त। दोघे समान असती की।।४०।। आवरावा हा युध्द प्रसंग। देई करोनी राज्य विभाग। भक्तवत्सल तू गोविंद। समान दृष्टी पाही तयांसी।।४१।। ते मानतसे जगन्मोहन। पद्मावती धरी

हरिचरण। म्हणे प्राणनाथ ऐका वचन। करुन द्यावे राज्यविभाग।।४२।। मग उभयता बोलावून। हरी देतसे राज्य वाटून। तोंड देशी स्थापिल तोंडमान। वसुदानास नारायणपुरी।।४३।। विभाग करीत असता उत्तम। राहीले शेष तीन ग्राम। उभयतांनी हरीस दीले सप्रेम। पद्मावतीसह आला स्वस्थानी।।४४।। असे हरिभक्त तोंडमान। येतसे दर्शना नेमे करुन। म्हणे तो श्रीहरि लागोन। काही सेवा घ्या मज पासोन।।४५।। हरि आज्ञापिसे तयासी। शेषाद्रिवरी राहण्यासी। रचावे सुंदर मंदिरासी। गोपूरे दोन निर्मावी।।४६।। पाकशाळा कोशसदन। धान्यशाळा पशुशाळा गहन। चित्रविचित्र सोपान। पर्वतावरी नेटके बांधावे।।४७।। स्वामितीर्थासी पायऱ्या। बांधाव्या हे नृपवर्या। मग विश्वकर्मासी बोलावूनिया। आज्ञा तयासी दिधली।।४८।। सांगितले विश्वकर्म्या लागोन। घेऊन नृपतीचे आज्ञा प्रमाण। मंदिर रचावे शोभायमान। तेणे मंदिर रचियेले।।४९।। उत्तम दिन सुमुहुर्त पाहोन। पद्मावती सहित जनार्दन। आले ब्रह्मादिदेव संपूर्ण। मंदिरा माजी ते प्रवेश करीती।।५०।। हरीसी पूजितसे तोंडमान। स्वहस्ते दीप लावी कमलासन। कलियुगाचे होय अवसान। तोवरी स्थिर राहोत हे।।५१।। या विमानाचे होईल पतन। या दीपांचे होता अवसान। तेंव्हा अवतार संपवील भगवान। निश्चय विधीने कथिला।।५२।। द्वितीयेचे दिवशी ध्वजारोपण। नानापरीचे नैवैद्य निर्मून। श्रीहरीसी करोनी अर्पण।

ब्रह्मकल्पोत्सव करीतसे।।५३।। अष्टमीसी हनुमंत वाहन। नवमीसी रथोत्सव पूर्ण। मग गरुड वाहन काढोन। उत्साह केला नानापरी।।५४।। करोनिया अवभृत स्नान। स्वस्थानासी गेला तोंडमान। नित्यत्रिकाळ हरि दर्शनास। तोंडमान नृप येत असे।।५५।। आज सुद्धा भक्त प्रेमळ। आश्विनमासीं यात्रा प्रबळ। पहावयासी घननीळ प्रेमळ। वेंकटाद्रिसी नित्य येती।।५६।। व्यंकटेश भक्त तोंडमान नृपती। त्याचे राज्यात बहुत नीती। धीर वीर सर्व एकपत्नी व्रती। सकल जनी नांदतसे प्रीती।।५७।। सर्वही व्यंकटेशाचे भक्त। स्त्रिया सर्व धर्माचरणे वर्तत। दुष्काळ दारिद्रय अवर्षण। नाही राज्यात सर्वथा।।५८।। परी एक दिनी घडे नवल। वसिष्ठ गोत्रीचा कूर्म विप्र। पुत्र आणि स्वस्त्री समवेत। दर्शना आला रायाच्या।।५९।। तयासी षोडशोपचारे पूजून। राये पूसिले वर्तमान। म्हणे स्त्रीपुत्रासी सवे घेऊन। निघाला असा कवण्या पंथे।।६०।। निघालो होतो गंगास्नानासी। परी स्त्री असे गर्भिण पंचमासी। जावे कैसे आता पुढे यात्रेसी। म्हणून तुजकडे असे आलो।।६१।। येईन मी षण्मासात परतोन। तव वरी राया करी यांचे पालन। धर्मात्मा तू असशी पुण्यपरायण। करावे इतुके काज माझे।।६२।। अवश्य म्हणून तोंडमान। विप्रासी देवोनी पुष्कळ धन। बोळविला तयास यात्रेकारण। स्त्रीपुत्रासी ठेवूनी घेतले।।६३।। मग विप्रस्त्रीसी देवोनी मंदिर। ठेवीले त्यात षण्मासा पुरते अन्न। मग

करोनी दृढ द्वारबंधन। आपण राज्य कार्यी लागला।।६४।। ब्राह्मण ऐसा गेला यात्रेस। तीर्थे हिंडता गेले बहु दिवस। लोटून गेली दोन वर्षी। विप्र परत येण्या निघाला।।६५।। विप्रस्त्रीसाठी षण्मासापुरते अन्न। ठेविले होते राजाने पूर्ण। गेले ते अन्न सर्व संपून। स्त्रीपुत्र अन्नाभावे मृत झाले।।६६।। दोन वर्ष लोटल्यानंतर। आला परत तो द्विजवर। भेटला तो रायासी सत्वर। रायासी आशीर्वाद देतसे।।६७।। मग रायासी पूसतसे वर्तमान। माझी स्त्री आणि पुत्र। आहेत सुखी ना यथार्थ। असेल स्त्री प्रसूत झाली।।६८।। राया मनात गेला घाबरोन। दूतांकरवी आणविले वर्तमान। दूत म्हणती सकल पावले मरण। अस्थि पडल्या असती तेथे।।६९।। मी न समे पाहीले तयांते। विप्र कोपेल मजवरुते। परम संकट पडले रायाते। जाहला घाबरा तो अंतरी।।७०।। म्हणे बहु कृपाळ माझा व्यंकट। करील दूर तोची हे संकट। गेला मनसा तयासी शरण। तोंडमानराजा तेधवा।।७१।। बुध्दिदाता प्रत्यक्ष भगवंत। धैर्य अपूर्व धरोनी मनात। तोंडमान मग बोलत। त्या विप्रासी तेधवा।।७२।। ऐक ब्राह्मणा माझी मात। तुझी पत्नी झाली प्रसूत। जाहले तिजसी कन्यारत्न। बहु आनंदे ती वर्ततसे।।७३।। आता कन्यापुत्रास घेऊन। आजच प्रातःकाळी उठून। गेली ती व्यंकटेश दर्शनाकारण। वेंकटगिरीवरी बहु आनंदे।।७४।। आपण आता स्नानादि करोन। करावे सावकाश भोजन। येईल ती इतुक्यात परतोन। हरिदर्शन

घेवोनिया।।७५।। ऐकोनी द्विज जाहला प्रसन्न। गेला तो स्नाना लागोन। इकडे गुहामार्गे तोंडमान। हरिदर्शनासी आला।।७६।। व्यंकटेश पूसले कारण। तोंडमान सांगे वर्तमान। दोन वर्षा मागे एक विप्र। स्त्रीपुत्रासह मजकडे आला।।७७।। म्हणाला मज जातो यात्रेस। येईन परत षण्मासात। मग मजपाशी ठेवोनी स्त्रीपुत्र। यात्रेस तो विप्र गेला।।७८।। षण्मासापुरते अन्न साहीत्य। देवोनी ठेविले मंदिरात। व्यग्र झालो मम कार्यात। नसे मज त्यांचे स्मरण।।७९।। लोटली यास दोन वर्षे। आता विप्र आला परतोन। विप्रे पूसता स्त्रीपुत्र वृत्त। स्मरण तयांचे झाले मज।।८०।। दूत धाडोनी पाहीले तेथ। निमाली ती अन्न अन्न करुन। अस्थिंची रास त्या मंदिरात। असे पडली केशवा।।८१।। मी ऐसेची बोललो विप्रास। तव स्त्रीस झाले कन्यारत्न। पुत्रकन्यासी घेवोनी आजच। वेंकटाद्रिसी ती असे गेली।।८२।। व्यंकटेशा करी मजसी क्षमा। वाचवावे मज मेघश्यामा। श्रीहरि मग बोले तोंडमाना। अस्थी सत्वर आणवावी।।८३।। स्वामितीर्थतीरी ठेविल्या अस्थी। त्यावरी जल शिंपीतसे हरी। कृपा दृष्टीने पाहता श्रीपती। नवल अद्‌भूत घडले।।८४।। स्त्री अन् कुमर - कुमारी। निद्रिस्तापरी उठीले झडकरी। तोंडकाम आनंदला अंतरी। म्हणे रमारमण पावला मज।।८५।। तोंडमानासी श्रीहरी बोलत। असे आता कलियुग वर्तत। होतील अधर्मरत जन समस्त। यास्तव राहू आम्ही गुप्त।।८६।। तोंडमान

अर्पी स्त्रीसुत विप्रास। बहु आनंदित झाला विप्र। पुसतसे तो आपुले स्त्रीस। कोठे गेली होतीस तू।।८७।। म्हणे यात्रेस गेल्यावरी आपण। पावलो मरण अन्नाविन। व्यंकटेशाचे उदरी जाण। होतो गेलो सर्वही।।८८।। अनंत ब्रह्मांड हे समग्र। सर्व देवांसहित चतुर्वक्त्र। प्रत्यक्ष मी पाहीला साचार। मग पुत्र तयासी सांगतसे।।८९।। पाहीला मी प्रत्यक्ष त्रिपुरारि। कन्या म्हणे देखिले वन हरि उदरी। देव दानव यक्षगण पाहीले मी। आपण आम्हा बोलविले।।९०।। विप्र म्हणे धिग् माझा जन्म। धिग् यात्रा वेदाध्यायन। धिग् माझे सर्वही साधन। हरिप्राप्तीविण व्यर्थ सारे।।९१।। स्त्रीपुत्रासह विप्र गेला स्वदेशी। तोंडमाने मग श्रीहरीसी। सहस्र सुवर्ण तुलसी मंजिरी। अर्पिल्या भक्तिभावे करुन।।९२।। दुसरे दिनी मग तोंडमान। गेला परत हरि पूजना लागोन। मृण्मय तुलसींचे पूजन पाहून। पूसे श्रीनिवासा हे नवल काय।।९३।। व्यंकटेश म्हणे तोंडमानासी। आहेत मम भक्त कोटयावधी। भक्त श्रीमंत आणि दरिद्री। समसमान असती ते मज।।९४।। उत्तरदेशीचा मम प्रियभक्त। कुलाल जातीचा भीम नाम। मृण्मय तुलसी तयाने करुन। भक्तिभावे मज अर्पिल्या।।९५।। ऐसे ऐकून तोंडमान नृप। जाता झाला त्या ग्रामास। तो कुलाल मग नृपतीस। बोलता झाला तेधवा।।९६।। मी दरिद्री क्षुद्र याती। कशास आला येथे नृपती। इतुक्यात तेथे खगपती। वैकुण्ठीहूनी आला तेथे।।९७।। स्त्रियेसहीत तो

कुलाल। दिव्यरुप झाला तत्काळ। सायुज्यता मुक्ती त्यास। श्रीहरीने दिधली तेंव्हा।।९८।। तोंडमान म्हणे श्रीहरीसी। निजधामा पाठविले कुलालासी। मग श्रीहरीने तोंडमानासी। सरुपता मुक्ती दिधली।।९९।। असे ऐसा अगाध महिमा। वैकुण्ठवासी श्रीनिवासाचा। तो ऐसा नवशतीत वर्णिण्या। समर्थ असती श्रीस्वामीची।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## संकटमोचन श्रीव्यंकटेश स्तोत्र

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री व्यंकटेशा वासुदेव रमारमणा। प्रद्युम्ना हीरकेशवा मनमोहना। अगाध अनंता तव वर्णन करण्या। नसे वा मी समर्थ श्रीनिवासा।।१।। नमन कमलावरा कमल भूषणा। कमलोद्‌भवजनका कमलनयना। कमलनाभा कमलशयना। कमलधारका कमलाश्रीप्रिया।।२।। प्रथमे मत्स्य अवतार होऊनी। साकारले या सुंदर विश्वासी। चंचल लाजवंत विश्वाकारी बनुनी तारावे या भक्तासी।।३।।भक्तमनभ्रमराकर्षक वदनकमळा। भक्तचित्ता निधान श्रीमुखकमळा। भक्तजनविश्राम हृदयारविंदा। वंदिती सकल तव पद्मचरणा।।४।। ऐसा तू मनोहारी। मुरलीधर। वाजविसी तू पावा सुमधुर। होती धुंद गोपीजनमन मयुर। ऐसा चित्रकर्षक तू संकर्षण।।५।। घडता तुझे रे प्रत्यक्षदर्शन। होतसे तृप्त भक्तजनांचे मन। अतिशय सुंदर तू इंदिरारमण। घेसी अवघ्यांचे चित्त आकर्षून।।६।। हे सच्चिदानंदा नारायणा। भवभयवारक रमारमणा। मुरलीधर मुरारी मधुसूदना। कैसे बा वर्णन करावे तुझे।।७।। असशी तू

विश्वव्यापक। विश्वाकार तू विश्वोध्दारक।।८।। अगमानिगमातीत तव स्वरुप। असे तवमहिमा शब्दातीत। निराकार निर्विकार तू परब्रह्म। वाणीसी न वर्णवे तव महती।।९।। सद्स्वरुप त्रिकालातीत रुप तुझे। प्रलयातीत शाश्वत अस्तिव तुझे। सकल जन्मांची ही भवगाठी तुटे। दर्शन रम्य तव होताची।।१०।। असशी प्रलयास्थित्यंतराचे कारण। व्यास शुकादि मुनि मन विश्राम। न वर्णु शके श्रेष्ठमाहात्म्य। वेदवेदांत अष्टांगदश पुराणांसी।।११।। भक्तवत्सल भवभयवारक। भक्ततारक भक्तोध्दारक। भक्ताधार भक्तसंकटमोचक। असशी तू भक्तांचा मनोनायक।।१२।। विश्वपालका विश्वाकार दयाघन तू। धरिसी विश्वतारण्या विविधावतार तू। विश्वाचे कारण विश्वविनायक तू। विश्वरुप विश्वस्वरुप हे तुझेची असे।।१३।। समुद्रमंथना कूर्मावतार घेऊन। मंदराचळासी स्वपाठीवरी तारुन। रक्षिलेस तू हे ब्रह्मांड। ऐसा श्रेष्ठ नारायण तू।।१४।। पृथ्वी हरुन नेत असता असूर। आलासी धावून वराह रुपे करुन। दंष्ट्रे आपुल्या पृथ्वीस तारुन। वधिलेस हिरण्याक्षासी तू।।१५।। भक्त प्रल्हाद पडता संकटी। स्तंभ भेटूनी तू अवतरलासी। नारसिंह रुपे हिरण्यकश्यपुसी। वधिलेस तू आपल्या हाती।।१६।। यज्ञ शत करीत असता बली। आलासी तूची वामनरुपधारी। तीन पावलांत व्यापून त्रिलोकासी। धाडीलेसी बळीसी पाताळी।।१७।। शक्तीने माजता क्षत्रिय भूवरी। धरीलेस भार्गवरुप

तू संकटहारी। निःक्षत्रिय पृथ्वी मातृकैवारी। केलीस तूची हे अंनता।।१८।। हर वरप्रसादे मातला रावण। केलेसी तू श्रीरामरुप धारण। मनुज रुपात हा अवतार घेऊन। निर्दाळीलेसी तू दैत्यांसी।।१९।। आलासी श्रीकृष्णरुपी द्वापारी। वधिले कंस चाणूर शिशुपाळादि सुराही। मनमोहक रुप धारण करुनी। घेतले जिंकून भक्तमनांसी।।२०।। कलियुगी मजुजायुष्य बहु अल्प। बुध्दिसामर्थ्य ही झालेसे अल्प। बौध्दरुप तू करुन धारण। शांती संदेश तूची दिलासी।।२१।। कलियुगात माजला हा हा कार। मातले असुर दुष्ट दुर्जन सकल। श्रीधरा तू धरशी कल्किरुप। निर्दाळीसी दैत्य दुर्जना।।२२।। येता संकट गजेंद्रवरी। धरीला तयाचा पाय सुसरी। करीता तुझे नामस्मरण मुरारी। संकटातूनी त्यासी रक्षिले।।२३।। भक्तजन विश्राम व्यंकटेश। फिरवू नको आम्हासी दशदिशा। करुनी संकटहरण जगदीशा। तारी आम्हासी भक्तवत्सला।।२४।। करीता हया स्तोत्राचे श्रवण। अथवा करीता भक्तिभावे पठण। होऊन सकलसंकटाचे हरण। देईल सौख्य श्रीधर श्रीवत्सलांछन मिरवी जो।।२५।। स्वामी समर्थ कृपे हे स्तोत्र। अवतरीले ते भक्तकल्याणास्तव। याचे श्रवणे पठणे मात्र। निर्मळ शुध्द आनंद लाभेल मनासी।।२६।।

शुभं भवतु शुभं भवतु

।। श्री गणेशाय नमः ।।

पारय मां श्री व्यङकटेश

हे नारायण, हे लक्ष्मीरमण,

हे श्रीनिवास, हे व्यङकटेश।

व्यङकटेश। व्यङकटेश। रक्ष मां त्वम्।

व्यङकटेश। व्यङकटेश। पाहि मां त्वम्।

पाहि मां त्वम्। त्राहि मां त्वम्। पाहि मां त्वम्। त्राहि मां त्वम्

एहि, एहि, एहि मां पाहि।

एहि, एहि, एहि मां त्राहि।

मां पाहि, मां त्राहि, मां पाहि, मां त्राहि, मां पाहि।

न कृतं मया ध्यानावाहनम्। तव कृते मया नार्पितासनम्।

पाद्यं अर्घ्यं नार्पितं कदा। पंचामृताभिषेकं नार्पितं मया।

तारय माम्। पालय माम्। पोषय माम्। व्यङकटेश ।।१।।

नानीतं गाङ्गतोयम्। नानीता पुष्पमाला।
नो चर्चितं चन्दनेन। नो वेशितं अम्बरेण।।
तारय माम्। पालय माम्। पोषय माम्। व्यङ्कटेश ।।२।।
नालंकृतं भूषणैः। नार्चितं कदा प्रसूनैः।
धूपैः दीपैः। नपञ्चविधभक्षै पूजितं मया।।
तारय माम्। पालय माम्। पोषय माम्। व्यङ्कटेश ।।३।।
नानीतं रुचिकरं फलम्। ताम्बूलं कर्पूरमिश्रितम्।
न कृतं मया आर्तिक्यम्। नृत्यं गीतं तथा प्रार्थनाम्।
तारय माम्। पालय माम्। पोषय माम्। व्यङ्कटेश ।।४।।
पापमयी पङ्के पतितोऽस्मि मोहमये पाशे बन्धितोस्मि।
त्रिगुणावर्णे आवृतोऽस्मि। संसारसागरे निमज्जितोऽस्मि।
उध्दर माम्। मोचय माम्। पारय माम्। व्यंङकटेश ।।५।।